म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.

# स्वेदगंगा

विंदा करंदीकर

REFBK-0017547
REFBK-0017547

# स्वेदगंगा

विंदा करंदीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
REFBK-0017547
REFBK-0017547

पॉप्युलर प्रकाशन

© गो. वि. करंदीकर

पहिली आवृत्ती १९४९
प्रकाशक : लेखक

दुसरी आवृत्ती १९५८
प्रकाशक :
देशमुख आणि कंपनी

पुनर्मुद्रण १९६९/१८९१

मुद्रक :
चं. वि. रसाळ
मिरॅकल प्रेस
वरळी, मुंबई २५

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४

तीर्थरूप

आई, दादा व दत्तूकाका यांस

सप्रेम समर्पण

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

'स्वेदगंगे'तल्या कांहीं निवडक कविता श्री. करंदीकरांनीं मला वाचून दाखविल्या, तेव्हां एकदम कांहीं तरी नवीन, वेगळ्याच प्रकारचें काव्य ऐकल्याचा आनंद मला झाला. याचा अर्थ असा नव्हे कीं, आतांपर्यंतच्या आधुनिक मराठी काव्यांत जें कधीं झालेंच नाहीं असें कांहीं अजिबात अपूर्व करंदीकरांच्या काव्यांत आहे. अलीकडे मराठी कवितेला चांगलाच बहर आला आहे; आणि पुष्कळ तरुण कवि पुष्कळच चांगलें काव्य लिहीत आहेत. त्यांच्यापैकीं उत्तम जे आहेत त्यांच्यापेक्षांहि उत्कृष्ट असें कांहीं 'स्वेदगंगे'त आहे किंवा 'स्वेदगंगा' अद्वितीय आहे असें मला म्हणावयाचें नाहीं. अमक्यापेक्षां बरें किंवा अमक्यापेक्षां वाईट अशी ही तुलनाच नाहीं.

तसें पाहिलें तर 'मजूर', 'स्वेदगंगा', 'कीर्तन', वगैरे त्यांच्या उत्तम कवितांचे विषय नेहमीचेच आहेत; पण सर्वच जातिवंत कवींप्रमाणें त्यांनीं या जुन्याच विषयांत एक नवीनच तेज आणि एक नवीनच ओज ओतलें आहे. आपण लिहितों आहोंत तो छंद आहे, मुक्तछंद आहे, कीं केवळ तालबद्ध गद्य आहे, याची पर्वा त्यांनीं केलेली नाहीं. पण जें आहे त्यांतला ओघ आणि जोष वॉल्ट व्हिटमन किंवा कार्ल सँडबर्ग या थोर अमेरिकन कवींची आठवण करून देतो, आणि तें सर्व काव्य वाटूं लागतें. भलत्याच तुलना मी करीत नाहीं,—आठवण करून देतों, इतकेंच म्हणतों.

बरेच कवि आत्मानुभवाच्या विशिष्ट संकुचित वर्तुळांतच फिरत राहिल्यामुळें त्यांच्या काव्यांत एक प्रकारची क्षुद्र स्वयंकेंद्रितता तरी येते; किंवा दुसऱ्या टोकाला जाऊन समाजमनस्क, पुरोगामी, राष्ट्रीय किंवा क्रांतिकारक कवि होण्याच्या हव्यासांत छंदोबद्ध अग्रलेख किंवा पद्यमय ओरडाआरड तरी त्यांच्याकडून लिहिली जाते. करंदीकरांच्या काव्यांत बऱ्याच ठिकाणीं हीं दोन्हीं टोकें टाळलीं जाऊन हवा तो समन्वय साधला गेला आहे.

इतिहासाच्या मार्क्सप्रणीत भौतिकवादाच्या विवेचनांत उत्पादनशक्ति हा पाया आणि धर्म, कला, संस्कृति, तत्त्वज्ञान, इत्यादि गोष्टी हे वर उठवलेले

इमले (सुपरस्ट्रक्चर्स) आहेत, असें म्हटलें आहे. 'स्वेदगंगे'तल्या पुढील ओळींत या रुक्ष विवेचनाचें किती सुरेख काव्य झालें आहे पहा :

*"स्वेदाची ही अखंड गंगा—*
*देश, धर्म, रक्ताचे सारे*
*फोडित धरणें नी बंधारे,*
*भिजवित माती काळी, गोरी,*
*पहा धावते अखिल जगावर.*
*जीवननौका नाचे त्यावर"......*

*"कांचनगंगेहुन जी सुंदर,*
*भागिरथीहुन जी पावनतर,*
*परमेशाहुन जनहिततत्पर,*
*त्या गंगेतिल स्वेदबिंदुनो !*
*प्रणाम माझा तुम्हा निरंतर"...*

छंदाचीं बंधनें झुगारून संतापयुक्त आवेशानें थरथरत धावणाऱ्या 'मजूर' या कवितेंतल्या पुढील ओळी वाचकाला आपल्यावरोबर सहज वाहून नेल्याशिवाय रहाणार नाहींत :

*"मजुरांच्या हाडांचा येथें जळतो अंगार सदा;*
*मजुरांच्या घामाच्या वाफेंवर फिरती हीं यंत्रें;*
*मजुरांचे पिंजुनियां स्नायू सूत इथें हें निघतें;*
*मजुरांच्या रक्ताच्या रंगानें तें सुंदर होतें.*
*आणिक त्यांच्या या त्यागास्तव मौलिक*
*झग झग झग झग झग झग*
*घरघरणारीं चक्रें म्हणतीं भीषण मंत्र वधाचे.*
*थरथरते ही भूमी खालीं—पाप तिला हें जाचे."...*

*"भों ऽऽऽऽ*
*सात वाजले, आणिक गिरणी सुटली;*

*तुरुंगातुनी स्मशानाकडे त्याची स्वारी वळली.*
*हें आलें त्याचें घर:*
*छे ! नच त्याचें ! घाणीचें घर:*
*डासांचें घर, प्लेगाचें घर, रोगट जंतूंचें घर !*
*ना त्याचें घर ! !*
*मृत्यूची ही प्रयोगशाळा मेसुर !"*

'कीर्तन' या कवितेंत खेड्यांतल्या कीर्तनाचें बहारदार शब्दचित्र रेखाटलें आहे. म्हाताऱ्या बुवांचें चित्र डोळ्यापुढें उभें करून गुरवाकडे कवि वळतात :

*"गुरव साथिचा पट्टीचा बजवय्या*
*साधाया सम मारित मुखडा तुकडा अथवा*
*तिय्या, कधीं न साधा !*
*धा तिरकिट तक् ता तिरकिट तक् गडां धा*
*गडां धा गडां धा ! !*

मग बुवांपुढले प्रतिष्ठित लोक, बायाबापड्या, पोरें यांचें विनोदी आणि उपरोधपूर्ण वर्णन करून दामाजीच्या 'मार्मिक आणिक तात्त्विक आणिक सात्विक' आख्यानाच्या छटा रंगविल्या आहेत. ही कविता वाचतांना कीर्तनाचें आपण चित्र पाहतों, बुवांच्या ताना, पखवाजाचा आवाज, पोरांचें किरकिरणें ऐकतों आणि 'पडक्या भिंतीभंवतीं अर्धउपाशी महार अथवा चांभार कुणी थोडे, भिंतीवरुनी पुढें झुकावुन माना, प्रयत्नपूर्वक ऐकत कीर्तन,—जें ऐकाया ये ना' त्यांना पाहत बाहेर पडतों.

बाह्य जगाच्या वर्णनाप्रमाणें आंतरभावनांचेंहि नाजुक चित्रण 'पुनर्मीलन' 'जीवितकोडीं' वगैरे कवितांत कवींनीं केलें आहे. 'दगडांतून देवाकडे' या प्रदीर्घ काव्यांत कवीनीं स्वतः म्हटल्याप्रमाणें तत्त्वचिकित्सा किंवा तर्कशुद्धता नाही. त्यांचा 'आत्मिक इतिहास' त्यांनीं सांगितला आहे. या काव्यांतला पुढील ओळींसारख्या कांहीं ओळी वाचकांच्या मनांत पुन्हां पुन्हां येतील :

*"'मिळतें' त्यावर हसते जनता;*
*मी रडतों 'न मिळे' त्याकरितां;*
*दिसो तुला पण 'ताज' मनांतिल*
*आणिक ताशिन दगड जन्मभर,*
*'ताज' पुरा जरि मम नच होईल.*

*मिळेल का सोन्याची घागर*
*माती तूं दिधलीस मला तर ?*
*ओझें एकच मी तर जाणें :*
*माती तूं दिधलीस मला तर*
*त्या मातीची घागर करणें."*

त्याचप्रमाणें 'नारद (शेंडेपांखरू)', 'बागुलबुवा' वगैरे अद्भुतरम्य वातावरण निर्माण करणारीं शिशुगीतेंहि 'स्वैदगंगे'त आहेत. 'बागुलबुवां'-तल्या पुढील ओळीं किती अद्भुत भयानक वातावरण निर्माण करतात पाहा :

*"बागुलबोवा पण म्हातारा;*
*उमर तयाची काय विचारा :*
*सात कमी वय सात हजारा !*
*कांहिं न त्याला दुसरें पचतें;*
*पोर शेंबडें रडवें रुचतें !*
*घेउन जातों असलीं बाळें*
*आणिक भरतो अपुले डोळे !*
*पसरुन पानें नंतर त्यावर*
*आपण बसतो त्या पानांवर;*
*आणिक जेव्हां पिकतें आडी*
*एक हळू मग खाण्या काढी !"*

हा बागुलबोवा आहे कसा ?

*"पिकलेली डोक्यावर झोंडी;*
*—तागाची तकतकते पेंढी !*

*जीभ फिरे दांतांतुन पाही;*
*मुसर जशी खडकांतुन येई.*
*दांत वाटती दगडच काळे;*
*कान सुपाच्याहुन मोठाले !"*

'इतिहासाचें अवजड ओझें', 'हेमगर्भ', वगैरे चुटकेहि चटकदार आहेत. शब्दचित्रें, भावगीतें, देवगड–राजापूरकडील कोकणी भाषेंतील गाणीं, बालगीतें, चुटके, हे इतके विविध काव्यप्रकार सहजपणें हाताळण्याची शक्ति बीजरूपानें कवीच्या प्रतिभेंत दिसून येते. तिचा संपूर्ण विकास होईल तेव्हां श्री. करंदीकरांना मराठी काव्यक्षेत्रांत महत्त्वाचें स्थान मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं याची मला खात्री वाटते.

५ मे, १९४९ —अनंत काणेकर

# दुसऱ्या आवृत्तीसाठीं 'ताजा कलम'

१९४९ च्या मे महिन्यांत विंदा करंदीकरांच्या 'स्वेदगंगे'ची पहिली आवृत्ति प्रकाशित झाली. तिला माझ्याकडून त्यांनीं प्रस्तावना लिहून घेतली होती. आतां जवळजवळ दहा वर्षांनीं त्यांच्या या पहिल्या कवितासंग्रहाची दुसरी आवृत्ति बाहेर पडत आहे. 'स्वेदगंगे'नंतर पांच वर्षांनीं १९५४ सालीं 'मृद्गंध' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आणि करंदीकरांचा कवि म्हणून चांगला बोलबाला झाला. सरकारी स्पर्धेत त्यांच्या 'मृद्गंधा'ला पहिलें पारितोषिकहि मिळालें. 'स्वेदगंगे'च्या या दुसऱ्या आवृत्तींत मागच्या काळांतल्या अठ्ठेचाळीस कवितांची भर लेखकानें घातली आहे. या कवितांना दोन संग्रहांतील जाणिवेला सांधणारा दुवा असें ते म्हणतात.

पहिल्या आवृत्तीला माझी प्रस्तावना आहे. तेव्हां दुसऱ्या आवृत्तींत घातलेली भर लक्षांत घेऊन मी माझ्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेला एक ताजा कलम लिहावा असा आग्रह करंदीकरांनीं धरला. त्यांच्यासारख्या आतां चांगल्याच प्रथितयश झालेल्या नवकवीनें प्रस्तावना, प्रस्तावनाकार, पहिली आवृत्ति, झालें गेलें सर्व कांहीं विसरून जायला पाहिजे! मी त्यांना तसें सांगत होतों. पण त्यांनीं ऐकलें नाहीं. खरोखरच प्रस्तावना घेण्याची ही जुनाट पद्धत नव्या लोकांनीं आतां साफ सोडून द्यायला पाहिजे असें मला वाटतें. या पद्धतीचा कांहीं उपयोग आहे यावरहि माझा विश्वास नाहीं. कांहीं प्रास्ताविक द्यायचेंच असेल तर लेखकानें स्वतःच्या लिखाणा-बद्दलचें स्वतःचें म्हणणें काय असेल तर तें सांगून टाकावें.

तें कांहीं असलें तरी हा 'ताजा कलम' लिहायला मला आनंदच वाटतो; कारण करंदीकरांची कविता मला आवडते. दुसरें असें कीं या निमित्तानें शहाणपणाचा आव आणण्याचीहि संधि मला मिळत आहे! पहिल्या प्रस्तावनेंत दहा वर्षांपूर्वींच मीं म्हटलें होतें कीं "श्री. करंदीकरांना मराठी काव्यक्षेत्रांत महत्त्वाचें स्थान मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं याची मला खात्री वाटते." आणि आतां खरोखरच त्यांना महत्त्वाचें स्थान मिळालें आहे. मला तशी खात्री वाटली होती, याचें कारण असें कीं,

मोठ्या प्रतिभेचें एक मोठें लक्षण काव्यानें असकेंच करावें आणि तसकेंच करूं नये असलीं बंधनें किंवा असल्या मर्यादा स्वतःच निर्माण करून त्या स्वतःलाच ती घालून घेत नाहीं. आणि हें लक्षण मला 'स्वेदगंगे'त दिसत होतें. जीवनांतल्या कशाचेंहि काव्य करतां येतें या जिद्दीनें मोठी प्रतिभा निर्मिति करित असते. त्यामुळें त्या निर्मितींत आपोआपच विविधता, विशालता, ओजस्विता येते. कवितेंत विचाराला प्राधान्य असूं नये, कवितेनें प्रचार करूं नये, कवितेला बोधाचें वावडें आहे, असलीं बंधनें ती स्वतःवर लादून घेत नाहीं. तिला चुका करण्याचेंहि स्वातंत्र्य हवें असतें. मोठी प्रतिभा चुकाहि मोठ्या करते; आणि तरीहि, किंबहुना म्हणूनच, ती मोठी होते.

'स्वेदगंगे'च्या दुसऱ्या आवृत्तींत विविध प्रकारच्या कविता आहेत. कवीनें त्यांची वर्गवारी सामाजिक आशयाची कविता, व्यक्तिचित्रणात्मक कविता, प्रेमविषयक कविता, बालजीवनविषयक कविता, चिंतनात्मक कविता व देवगड-राजापूरकडील बोलीभाषेंतील कविता अशी केली आहे. या प्रत्येक वर्गांत कवीनें घातलेली नवी भर कवीच्या प्रतिभेची झेप उंचावल्याची आणि परीघ रुंदावल्याची साक्ष देते.

२९ नोव्हेंबर, १९५८

—अनंत काणेकर

## अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्तावना | |
| स्वेदगंगा | १ |
| होळी | ११ |
| लढाई व बढाई | १३ |
| विजयी भारत | १५ |
| कालीचे संदेश | १६ |
| मुंबई | १८ |
| संजीवनी मंत्र | १९ |
| प्रार्थना | २१ |
| आवाहन | २२ |
| उठा उठा तयार व्हा! | २४ |
| ध्वजगीत | २५ |
| लोकशक्ति ही | २६ |
| काय केलेंस हें? | २७ |
| * समतेचें हें तुफान उठलें | २९ |
| * पवित्र मजला | ३० |
| * ब्रह्म जाहलें वामन | ३१ |
| * जगण्यामध्यें ब्रह्मानंद | ३२ |
| * मानवांनो आंत या रे | ३३ |
| * विरूप | ३४ |
| * जय गोपाळ | ३६ |
| * मृत्यूलाही लाज आहे | ३८ |
| * अश्वत्थामाच ठरला चिरंजीव | ४० |
| * टाकसाळ ती मनांत हसते | ४२ |
| * सब् घोडे बारा टक्के | ४३ |
| * हेंचि दान दे गा देवा | ४५ |
| मजूर | ४७ |
| साक्षात्कार | ५१ |




२

| | | |
|---|---|---|
| | कीर्तन | ५४ |
| | सरोज नवानगरवाली | ५८ |
| * | चक्रमत्ता | ६० |
| * | शेवटची आगबोट | ६२ |
| | निरोप घेतांना | ६८ |
| | एक वेडा | ७० |
| | तूं व जीवन | ७२ |
| | अपुरें प्रेम | ७४ |
| | तयारी | ७५ |
| | संशय | ७६ |
| | विजय | ७७ |
| | उन्माद | ७८ |
| | लाज | ७९ |
| | तूं गातेस तेव्हां | ८० |
| | रक्तसमाधि | ८२ |
| | पुनर्मीलन | ८४ |
| * | अन पहिल्या भेटींतच | ८६ |
| * | नुकतें नुकतें | ८७ |
| * | मला तुला नच फुलवायाची | ८८ |
| * | तुझ्या देहाचीच ज्योत | ८९ |
| * | वाट तुझी पाहतसे | ९० |
| * | वेध | ९१ |
| * | थोडी सुखी, थोडी कष्टी | ९२ |
| * | विप्रलंभ | ९४ |
| * | घेरी | ९६ |
| * | आत्मिक अपघात | ९७ |
| * | समज तुझा हा गौरव | ९९ |
| * | अशा प्रसंगीं | १०० |

* मला वाटलें १०१
* आंगठी १०२
* सखे, तुझें जाईचें जीवन १०४
* नूरजहाँ १०५
* दैवावरी देण्या मात १०६
* कांटे १०७
* तीर्थाटण १०८
* एक प्रश्नोत्तर १०९
* अग्नितुला ११०
* किती विलक्षण ! १११
* डंख ११२
* फ्राइडला कळलेलें संक्रमण ११३
* समज असें कीं हें वरवरचें ११४
माझें घड्याळ ११५
जादूगार ११८
बेडकांचें गाणें १२२
आमचा राजा १२३
पंतोजी १२४
बागुलबोवा १२७
नारद १२९
पतंग १३१
उसनें १३३
शेवटचा लाडू १३४
* चिमुरडी १३५
* गणपतिबाप्पा १३६
* येरे येरे पावसा १३७
दगडांतून देवाकडे १३८
जीवितकोडें १६०

| | | |
|---|---|---|
| | पहांटे | १६२ |
| | नाच | १६३ |
| | मंदिर | १६५ |
| * | निळा पक्षी | १६६ |
| * | मी सापडलों त्या जाळ्यांतुन | १६८ |
| * | पिशी मावशी | १६९ |
| * | मला न कोठें मिळते जागा | १७० |
| | मराठीचा विलाप | १७१ |
| | प्रतिभेस | १७३ |
| | लाव्हा | १७५ |
| | निंदकास | १७६ |
| | माझी बाग | १७८ |
| | रुद्रवीणा | १८० |
| * | मृद्‌गंध | १८१ |
| * | मांत्रिक | १८२ |
| | तरंग | १८४ |
| ¶ | काजवे | १८६ |
| | भरतीची लाट | १९८ |
| | चिक्‌लीनंतर | २०० |
| | माज्या घरीं | २०१ |
| | भुताबाईच्या राईंत | २०२ |
| | मोती | २०३ |
| | मुंबय्‌ची चाकरी | २०४ |
| | भावय | २०६ |

* दुसऱ्या आवृत्तींत समाविष्ट केलेल्या नव्या कवितांमागें अशी फुली केली आहे.

¶ पहिल्या आवृत्तींतील सर्व चुटके या सदराखालीं एकत्र आणले आहेत.

स्वेद्गंगा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९६४८०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

१.

भागिरथीचें करण्या दर्शन
पापाचें करण्या परिमार्जन
गंगातीरावरतीं सज्जन
सायंकाळीं प्रशांत समयीं
जमले; आणिक करिती भाषण :

'गंगा सर्व नद्यांहुन शुभकर.'
एक बोलला; दुसरा त्यावर,
'सुंदर गंगेहुन स्वर्गंगा.'
सहज बोलला नंतर तिसरा,
'लुप्त जाहली तिसरी गंगा!'

वृथाच वटवट, प्रचार नंगा.
शब्द कशाला वदतां जहरी?
लुप्त कोठची! ऐका सज्जन
घोंघावत ही गंगा तिसरी.

२.

स्वेद्गंगा

स्वेदाची ही अखंड गंगा
धापा टाकित वाहत आहे
अनंतांतुनी अनंताकडे.

खडकावरतीं ह्याणित डोकें,
कडेकपारी फोडित साऱ्या,
दरीदरींतुन मारि भराऱ्या.

स्वेदाची ही अखंड गंगा—
देश, धर्म, रक्ताचे सारें
फोडित धरणें नी बंधारे,
भिजवित माती काळी, गोरी,
पहा धावते अखिल जगावर.
जीवननौका नाचे त्यावर.

स्वेदाची ही अखंड गंगा—
दिवसां, रात्रीं, सांजसकाळीं,
जशी हिवाळीं तशी उन्हाळीं
वाहत होती; वाहत राहे.
उफाळलेली नागिण जैशी
जो जो तुडवी त्याला दंशी.

स्वेदाची ही अखंड गंगा—
शेतांतिल त्या औतामागुन,
गिरण्यांच्या यंत्रांच्या जवळुन,
खाणींतुन वा खड्गामागुन,
बेभान पुढें वाहत धावे
बुजवित शिक्के, बुजवित नांवें.

स्वेदाची ही अखंड गंगा—
खणीत डोंगर, भरीत डबरे,
समान करुनी भंवतीं सारें,
युगायुगांतुन प्रवाह बदलित,

परमेच्छेचा विकास साधी.
धुळीस मिळवी जुलमी गादी.

स्वेदाची ही अखंड गंगा—
—तांबडमाती, काळें पाणी—
गात नवीं क्रांतीचीं गाणीं
विविध मुखांनीं, विविध दिशांनीं,
शोधित सागर संघटनेचा,
स्वातंत्र्याचा, नव्या युगाचा.

३.

## पुजारी

गंगेच्या तीरावर सारे
स्वार्थाचीं क्षेत्रें रचणारे
देवपुजारी अनेक जमती
नफेबाजिचे मंत्र म्हणाया,
पुजावया चैनीची मूर्ती.

प्रसन्न ही चैनीची देवी
फक्त आपणां सदैव व्हावी
म्हणुनी करण्या अभिषेक वरी
देवपुजारी स्वेदनदींतिल
स्वेदबिंदुंनीं भरती झारी.

चैनीचा बगिचा शिंपाया
स्वेदबिंदु ना देतिल काया;

करितां बांधुन अभेद्य धरणें
स्वेदबिंदुंना वदे पुजारी,
'आतां येणें, अथवा मरणें.'

समाजगंगा ही स्वेदाची
अशीच वाहत रहावयाची
कशास हीं कानूंचीं धरणें ?
धरणें गेलीं तर, भोंदूंनो !
स्वार्थांची कावड ना भरणें.

क्षणाक्षणाला वाढतसे जल;
क्षणाक्षणाला वाढतसे बल;
वृथाच रचतां बांध तिरावर;
लिपाल तितके फुटतिल सारे;
सर्वच जाइल पुरावरोबर.

अरे पुजाऱ्या, कशास भ्रांती ?
पाणी भरलें तुझ्या सभोंतीं;
बुडेल देउळ बुडशिल तूंही;
तुझ्याच धरणीं तुजला पुरुनी
स्वेदनदी ही वाहत राही.

वृथाच तुमचीं सगळीं धरणें;
स्वेदनदी नच उलटी फिरणें;
धो धो वाहत पुढेंच जाइल;
आणिक जे अडवाया येतिल
मढीं तयांचीं वाहुन नेइल.

पवित्र हें गंगाजळ सारें
देवीवरतीं वाहुं नका रे !

देवीहुनही हें पावनवर;
पुजा पुजा रे मानव यानें;
पुजा पुजा रे समाजशंकर.

४.

## स्वेदबिंदु

स्वेदबिंदुंनो विसरा भीती.
खूण बाळगा एकच चित्तीं:
अहित जयांतुन तीच अनीती.
वेद यांत नी यांत बायबल;
पुराण अथवा कुराण यांतच;
मतामतांचा सोडा गोंधळ.

रूढि-धर्म-नीतीची बेडी
तुम्हां बांधुनी इतरां सोडी.
हातोडा हाणाच तयांवर.
पाय मोकळे तुमचे होतां
ध्येय गाठतां येइल सत्वर.

युक्तीवांचुन मिळे न मुक्ती;
युक्तीवांचुन फळे न शक्ती;
युक्तीची आई तर बुद्धी.
बुद्धिवाद हा झेंडा तुमचा;
बुद्धी मिळवा, मिळेल सिद्धी.

कालौघानें झिजतिल फत्तर;
मिळेल रस्ता सहजच नंतर:

मूर्ख अशा या आशा सोडा.
        सर्वस्वास्तव सर्व जणांनीं
क्रांतीशीं मग नातें जोडा.

विरोध ना विजयाला बाधे;
विरोध होतां विकास साधे;
विरोध करुनी अपुला चाकर,
        त्या पायावर लढा उभारा;
त्या पायावर नवयुगमंदिर.

अंतिम विजयास्तव कां शंका?
विश्व कुणाचें? ऐका डंका:
स्वेदाच्या घळघळत्या धारा
        विश्वाच्या राज्याच्या सनदा
तुमच्या भाळीं लिहिती साऱ्या.

स्वेदाबिंदुंनो! नद्यांत या रे:
स्वेदनद्यांनो! सागर व्हा रे;
संघटनेचा तुफान सागर;
        जो क्रांतीचा गर्जे जयजय
आणिक आणिल रत्नांना वर.

कितीक लढतिल तीं वाग्युद्धें;
कितीक जातिल सोडुन मध्यें;
कितीक हसतिल जे बघणारे;
        मित्र म्हणूनी येतिल शत्रू;
जपून उघडा अपुलीं दारें.

विचार इतुका कधीं न टाळा:
क्रांतीच्या अग्नींतुन जाई

भूक जया अग्नीहुन दाही;
बाकी सगळे भिडतां ज्वाला
पळतिल, आणिक बघतिल शेवट
फक्त यशाच्या वरण्या माळा.

संगर जिंकुन सरे न क्रांती;
क्रांतीला नच तिळ विश्रांती;
पहिला जय विजयाचें साधन;
नको ढिलाई करतांना नव
समाजसत्तेचें संस्थापन.

भूताची जर झाली माती,
भविष्य आहे तुमच्या हातीं.
हें जग, जें येणारें त्याचें;
मेलेल्याचें भरा न मळवट,
करा बारसें नविन जगाचें.

५.

## क्रांति

वृथाच ना व्हा निराश, कष्टी;
प्रचारपर्जन्याची वृष्टी
स्वेदबिंदुंना देइल डोळे;
अन्यायाच्या छातीवरतीं
क्रांतीचें मग नर्तन चाले.

संघटनेच्या ठेक्यावरतीं
विज्ञानाला घेउन साथी

मानवतेला उद्‌घोषित नव
        भविष्यकाळाच्या दरबारीं
दणदणतें क्रांतीचें तांडव.

वीष विषमतेचें नच साही;
समाजशंकर खवळुन जाई;
वादळ सुटलें, खवळे अर्णव;
        डुमडुमतो समतेचा डमरू;
दणदणतें क्रांतीचें तांडव.

फसवुनि भोळा समाजशंकर
पहा मातला हा भस्मासुर;
जो देई वर तोच हरे हर !
        घुमत अतां क्रांतीचें नर्तन;
असुर शिरावर घेत असे कर.

शस्त्रास्त्रांना धरुनी हातीं,
भिजवित रक्तानें नव माती,
क्रांती नाचतसे या भूवर.
        स्वेदबिंदुंनो बोला जयजय,
मुक्त तुम्ही व्हा, मुक्त करा नर.

वीष विषमतेचें जर दाही,
द्या डोक्यावर गंगामाई.
गंगा जगविल समाजशंकर.
        गंगा स्थापुनि समाजशीर्षी
मुक्त तुम्ही व्हा; मुक्त करा नर.

फेकुनि द्या दगडाचे गोटे,
फेकुनि द्या ढमढेरीं पोटें,

जगवा सत्य, तथा शिव, सुंदर.
घडवा विश्वाची नवमूर्ती.
मुक्त तुम्ही व्हा; मुक्त करा नर.

हत्तीसह बुडवा अंबारी;
मूर्तीसह द्या बुडवुनि मंदिर;
मानवतेला उद्धारा वर.
मानव रक्षा; दानव भक्षा;
मुक्त तुम्ही व्हा; मुक्त करा नर.

या क्रांतीच्या कराल दाढा
म्हणतिल, "मजला वाढा, वाढा;
विरोध आंतिल जेथें जहरी,
फुटकीं शिंगें, जीर्ण तुताऱ्या.
भग्न नगारे, भेसुर भेरी!"

या क्रांतीच्या कराल दाढा
म्हणतिल, "मजला वाढा, वाढा
अतिकामासह अक्रियता ती,
दारिद्र्यासह ती श्रीमंती,
अनंत पतितांसह उद्धारक,
भिक्षेसह दानाची भ्रांती."

या क्रांतीच्या कराल दाढा
म्हणतिल, "मजला वाढा, वाढा
जुने पुजारी, जुनाट मंदिर,
जुनाट राजे, झोटिंग जुने,
जुनाट कारा, जुनाट संगर."

जुन्या काळचीं पापें सारीं
क्रांती ही खाउन संहारी;
करी मशागत जुन्या जगाची.
स्वेदबिंदुंनो ! पिकवा नंतर
शेतें सुखकर नव्या युगाचीं.

६.

प्रणाम

कांचनगंगेहुन जी सुंदर,
भागिरथीहुन जी पावनतर,
परमेशाहुन जनहिततत्पर,
त्या गंगेंतिल स्वेदबिंदुंनो !
प्रणाम माझा तुम्हां निरंतर.

पवित्र मज स्वेदाचे बिंदू,
ज्यांतुन निपजे जीवनसिंधू;
या बिंदूंची माळ जयांवर
त्रिवार वंदन त्या संतांना.
विजय तयांचा ! त्यांचें जीवन !!

तासगांव
१०.१.४४

# होळी

रात्र आजची
रात्र असे शिमग्याची;
वाट कुणाची बघतां ?
उशीर झाला भलता;
समय असे हा मध्यान्हीचा झाला.
—शंका काय कुणाला ?
पहा फाडुनी डोळे पूर्ण समोंतीं;
—लोक न येती ?
आपण जाऊं पुढतीं.
—मागें ?
कोण पहाया लागे ?
पुढतीं फिरवा डोळा.
समय असे हा मध्यान्हीचा झाला.

चला अतां घ्या कुऱ्हाड हातीं;
घाव नेमके मारा;
आणिक तेहि झरारा;
तोडा आणिक घ्या खांद्यावर होळी,
होळी जीर्ण रुढीची.
तीच तुम्हांला जाची.
आणिक होळी मढवा :
जुन्या काळचीं जुनीं निशाणें चढवा.
खड्डा खोल खणा रे,
आणिक टाका मूळ गाडुनी सारें,
देव तिथें द्या ठेवुन;
टाका आणुन त्याच्यावरतीं सरपण.

—सरपण कुठचें ?
सरपण तुमच्या घरचें.
घाण जगीं जी सांचे—
जशी मनांतुन,
तशी जनांतुन,
घाण इथें या घेउन;
कोनकोपरे शोधा अपुल्या घरचे;
जुन्या काळचे आणा सडके फडके,
आग पहा ही भडके;
करा मोकळें खांद्यावरचें मडकें :
ओता स्वार्थ इथें नी सारी ओता फंदफितूरी;
ओता वैर विषारी आणी ओता वृत्ति जुगारी;
आणिक लोटा त्यांतच,
त्या यज्ञांतच,
घरभेद्यांना, उदासिनांना, भ्याडांना, भोंदूना.
—नको विचारच;
घाण जाउं दे जळुनी सारी आजच.

शंख अतां विजयाचा फुंका,
बडवा डंका,
दिवस उद्यांचा—
दिवस ठरो सोन्याचा;
संक्रमणाचा,
उत्साहाचा, स्वातंत्र्याचा,
नव्या युगाचा; नव्या जगाचा; नव्या खुल्या आशांचा !

करवीर

## लढाई व बढाई

मरतात तयांचि न कुणा क्षिती,
'मारली लढाई मी' म्हणती!

गुरें पोळलीं; शेतें जळलीं;
जीर्ण झोपडी ही कोसळली;
पाणि पिण्याला नुरली थाळी;
जरि दीन भुकेनें तळतळती.

अमर प्रीतिला घेउन शांती
जिथें सुखानें नांदत होती,
तिथें पसरलें स्मशान भंवतीं;
भिंतिचे दगड जों गडगडती.

सुजनांच्या भजनांचें गायन,
किंवा प्रेमळ निर्मळ भाषण
गेलें; परि कोलाहल भीषण;
छपरांतुनि घुबडें घुडघुडती.

त्यजुनी अपुलीं मातापितरें,
प्रिया लाडकी, प्रीय लेकरें,
प्राण जयांनीं अर्पियले रे!
समरांत शिपाई ते सडती.

मृतमांसाचे खाउनि तुकडे,
प्राशुनि त्यावरतीं रुधिर-घडे,
उन्मादानें इकडेतिकडे
कीर्तिचीं गिधाडें जणुं फिरती.

शिरकमलांची अर्पुनि माला,
नरमांसाचा प्रसाद केला;
रक्त घेतलें आचमनाला;
शांतिला पुजाया मग जमती!

मनमाड

# विजयी भारत

विजयी भारत, विजयी भारत, विजयी भारत प्यारा.

मुकुट हिमाचल अचल शिरावरि;
निर्मल गंगा हृदयस्थलावरि;
सागर चाकर पदकमलां चुरि;
दिशांदिशांतुन वाहे जेथें पवित्रतेचा वारा.

अशोक, विक्रम, चंद्रगुप्त तव,
प्रताप, गुरुगोविंद, तुझा शिव,
धन्य धन्य भारत तेजार्णव.
पूर्वेच्या हृदयांतुन उगवे जगतोद्दीपक तारा.

घे वीरांच्या हृदयाचे गड,
त्यागाच्या तोफांची धडधड,
प्रीतीच्या झेंड्याची फडफड;
जिवंत चाळिस कोटी जळत्या तरवारीच्या धारा.

करवीर
१७.१०.४१

# कालीचे संदेश

तोफांचा पखवाज वाजतो;
मदिरा रुधिराची चढली;
गळ्यांत घालुनि मुंडामाला
काली बघ नाचत आली.

दरोबस्त अंगांत बहादुरी,
नाच अरीच्या उरावरी;
रक्तानें न्हाणून रणांगण,
राष्ट्रांगण तें शुद्ध करी.

सत्तेनें जे मत्त जाहले,
कत्तल त्यांची पुरी करा;
कुणी कुणाचा गुलाम नाहीं—
मंत्र एकला मनीं स्मरा.

रूढी जाळुनि गुढी उभारा;
हीच दिवाळी, संक्रांती;
स्वातंत्र्याची फुका तुतारी;
विसरा भीती वा भ्रांती.

मेघांचे हे भव्य नगारे,
बिजलीची काठी पडली.
गडगड गडगड कडाड धडधड
समरदुंदुभी दणदणली.

विश्वविकासासाठीं चाले
समर कसें घनघोर पहा.

चंद्र, सूर्य, नक्षत्रें, तारे
तोफांचे गोळेच महा !

धूमकेतुचें निशाण फडके;
अनेकदां पडलें, चढलें;
चैतन्यानें जडसृष्टीशीं
अनेकदां झगडे केले.

भूतकाल तर कालच मेला;
पहा गड्या ! तूं उद्यांकडे.
झडति चौघडे चहूकडे नव,
पूर्वेला बघ गरुड उडे !

सांगली

# मुंबई

या उंच हवेल्या! कां रस्त्यावर पडतां?
हीं धान्यागारें! कां तळतळुनी मरतां?
हीं शीघ्र वाहनें! रखडत कां मग पायीं?
या प्रचंड गिरण्या! वस्त्र तुम्हां कां नाहीं?

छे! नगर नव्हे हें! हिंदभूमिच्या शरिरीं
वाटते जहाली जखम भयंकर जहरी;
शेटजी कोठले? त्यांत किडे लवलवती,
जे शरीर शोषुनि रक्तावरतीं जगती.

जर सूत्र हिच्यांतिल सर्वांसाठीं असतें,
ही जखम न असती, भूषण मजला गमतें!

करवीर

## संजीवनी मंत्र

पहा त्या प्रतापें प्रयत्नें विशाल
रणीं घोर शत्रूस संत्रस्त केलें;
कधीं लाभली त्यास शय्येस शीळ;
कधीं लाभलीं खावया कंदमूळें.
तरी सोडिला ना जगाचा महामंत्र.
संजीवनी मंत्र—स्वातंत्र्य, स्वातंत्र्य !

उभा धन्य बाजी प्रभू देशकाजीं,
पुढें शूर छाती, मनीं थोर निष्ठा;
जरी शत्रुचे येत दुर्दम्य वाजी,
तरी तत्त्वनिष्ठां न त्याची प्रतिष्ठा.
तया कोठला ? मृत्यु मृत्यूस मात्र;
संजीवनी मंत्र—स्वातंत्र्य, स्वातंत्र्य !

जगीं धन्य बंदा ! असे वीर खंदा;
अविश्वास वंदावया तो न राजी.
जरी तोडिलें, फोडिलें, धर्मवीरा;
जरी जाळिलें, सोलिलें धर्मकाजीं;
गर्जे उफाळून छावा महामंत्र,
संजीवनी मंत्र—स्वातंत्र्य, स्वातंत्र्य !

घरीं मंगला सोडुनीयां सुताच्या
स्वदेशास तानाजि मांगल्य देई,
बेड्या झुगारून स्वार्थी सुखाच्या,
रणीं अर्पुनी प्राण, निर्वाण घेई.
हौतात्म्य त्याचेंच; त्याचाच हा मंत्र,
संजीवनी मंत्र—स्वातंत्र्य, स्वातंत्र्य !

पुढें पाशवी क्रूर साम्राज्यशाही,
कुणा जन्मठेपी, कुणा देत फांशी,
कुणा हद्दपारी, नि कारा कुणाही,
कुणा राक्षसी यातनांनींच नाशी;
तरी नष्ट ना जाहला क्रांतिमंत्र,
संजीवनी मंत्र—स्वातंत्र्य, स्वातंत्र्य !

निंदा अमर्याद; वंदा कितीही;
बंदा स्तुतीचा इथें कोण नाहीं;
मिळो भाकरी वा मिळो खापरीही,
इथें चाकरी ना करी कोण भाई;
हें एक कर्तव्य; हा एकला मंत्र;
संजीवनी मंत्र—स्वातंत्र्य, स्वातंत्र्य !

करवीर

# प्रार्थना

प्रीति न स्वर्गावरतीं माझी; प्रीति न मुक्तीवरतीं!
इतकेंच मला रुचतें;
इतकेंच मला पुरतें :
दे, इतकें दे, देवा! ज्यास्तव हृदय सदोदित झुरतें.

वदन मला दे भारतभूचें विजयगीत गाण्याला;
दे मजला कर करण्या संगर तिच्याच स्वातंत्र्यास्तव;
आणिक दे मज ते पद,
तिच्या रिपूंच्या छातीवरतीं नाचतील जे गद्‌गद;
आणिक दे मज अंतर,
तिच्याच प्रेमादर-अभिमानें जें परिपूर्ण निरंतर;
दे निद्रा जी तिच्याच भवितव्याचीं दाविल स्वप्नें;
दे जागेपण तनमनधन अर्पुनियां सेवा करण्या;
जीवन दे मज, मरण तिच्यास्तव मरण्या;
—मरण तिच्या मृदु प्रेमळ मांडीवरतीं,
वंदेमातरमेव मुखांतुन स्वर गर्जत जों येती.

हीच प्रार्थना! हीच प्रार्थना! आतां आणिक पुढतीं
प्रीति न स्वर्गावरतीं माझी; प्रीति न मुक्तीवरतीं.

करवीर
२०.२.४२

मराठी ग्रंथ संग्रहालय

# आवाहन

नवयुवकांनो, संघटनेची तरवार करीं घ्या रे.

शिवरायाची स्मरुनी मूर्ती
जगांत पसरा भारतकीर्ती;
कराच परमेच्छेची पूर्ती;
गतकालांतुनि घेउनि स्फूर्ती भविष्य उजळा रे.

ओलांडुनियां सागर साती
स्वातंत्र्याचें गिळते मोतीं;
मगर धरा ती; पकडा हातीं;
त्या मगरीच्या पाडा दाढा, उदर विदारा रे.

तोफांच्या टेक्यावर साचा
प्रलयकाळचा नाचच नाचा;
कृतींत अपुले निश्चय वाचा;
आणिक ठेचा परवशतेचा नाग विषारी रे.

निशाण स्वातंत्र्याचें चढवा;
प्राण पणा लावुनियां लढवा;
विरोध लाथेखालीं तुडवा;
कलिकाळाला हाणुनि ठोकर, मरणच मारा रे.

रंग घेउनी रिपुरक्ताचा,
टांक आपुल्या घ्या भाल्याचा,
इतिहास लिहा भवितव्याचा,
स्वातंत्र्याचा, सद्धर्माचा, मानवतेचा रे.

पंचप्राणा करुनि समर्पण
क्रांतीला जा द्या आमंत्रण;
विजय तिचा तर विजयी तें रण;
बोला हरहर, जिंका संगर, विजय पुकारा रे.

तासगांव
२०.१२.४२

# उठा उठा तयार व्हा!

## उठा उठा तयार व्हा.

समाजरूपि ईश्वरा पुजावया करा त्वरा,
पंचप्राण लावुनी आरती तया करा!

आठवा मनीं शिवाजि, आठवा प्रतापगाजि,
आठवोनि भूतकाल या भविष्य रंगवा!

वाढवोनि राष्ट्रकार्य वाढवाच वृत्ति आर्य;
आणि हिंदिध्वज जगांत अग्रभागिं नाचवा!

एक नायका स्मरून, एक कामना धरून,
एक मार्ग आक्रमून, एक ध्येय घोषवा!

एक बुद्धि, एक भाव, एक ध्यास, एक घाव,
एक होउनी अनेक आक्रमा दिशा दहा!

वर्ण, जाति, पंथ, भेद सोडुनी बना अभेद,
हिंदि, हिंदि, हिंदि सर्व हाच भाव वाढवा!

त्यागि व्हा, शूर व्हा, वीर झुंजार व्हा,
मृत्युच्या शिरावरी स्वार होउनी रहा!

तासगांव
३.१.४३

# ध्वजगीत

तनमनधन अर्पाया देइ चेतना;
चक्रांकित राष्ट्रध्वजा अर्पुं वंदना.

वीरांच्या त्यागाचें प्रतिक जो असे,
जो हिंदी संस्कृतिचें चिन्ह शुद्धसें,
अखिल हिंद राष्ट्रात्मा मूर्तिमंत जो,
जो नीति, ज्ञान, शौर्य, तेज दावितो,
विश्वहिताकरितां करि समरनर्तना,
चक्रांकित राष्ट्रध्वजा अर्पुं वंदना.

डुलतां जो नष्ट करी दैन्य, भीरुता;
जो येतां हृदयिं भरे प्रेम, एकता;
विजयानें ज्याच्या जगिं शांतता वसे;
ज्याखालीं मानवांत भिन्नता नसे;
राष्ट्रधर्म, जनकीर्ती नेइ वर्धना;
चक्रांकित राष्ट्रध्वजा अर्पुं वंदना.

रत्नागिरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७९१५८ दि
क्रमांक १९७८ नों. दि.

# लोकशक्ति ही

लक्षहस्त लक्षपाद लोकशक्ति ही
क्रांतीच्या दीर्घांतुन मुक्ति शोधिते;
शोधिते नव्या युगास : ज्यांत पूर्णता
पावतीं अनेक उच्च दिव्य कामना;
भासयुक्त स्वप्नसृष्टि आज जी गमे
तीच तेथ दृश्य देह घेउनी फिरे;
पाजळीत दीप जेथ आज तम भरे;
नेसवीत त्यास ज्यास आज नग्नता;
देत घास ज्यास आज भूक खातसे.

लक्षहस्त लक्षपाद लोकशक्ति ही
क्रांतीच्या दीर्घांतुन शोधि जीवना;
जेथ 'आज' 'काल'हून सुखद होतसे;
जेथ कष्टताति सर्व; सर्व भोगती;
जेथ काम हें न कष्ट; खेळ श्रेष्ठ तो;
ज्यांत जीवनाशि नाच सकल नाचती.
मानवास मानवांत शत्रु जेथ ना;
जेथ विकसती फुलासमान योजना
थोर थोर ध्येयपूर्ण; जीवनीं अशा
ना विचार स्वार्थीचा भक्ष्य होतसे;
ना कृती गतानुगतिक प्राणशून्य जी;
दैन्यता न जीवनांत फक्त दिव्यता;
भव्यता कृतींत आणि पूर्ण एकता
मानवांत. स्वप्न जेथ सत्य होतसे.
लक्षहस्त लक्षपाद लोकशक्ति ही
क्रांतीच्या दीर्घांतुन तेथ जातसे.

मुंबई

## काय केलेंस हें ?

काय केलेंस हें? मानवा! मानवा!
या महात्म्याचिया भग्न हृदयांतुनी
काय हें वाहतें? भारता दाहतें?
रक्त ना, रक्त ना, तप्त लाव्हाच हा;
उग्र ज्वालामुखी. थांबवा रे कुणी
प्रलयपर्जन्य हा; थांबवा, थांबवा,
रक्तगंगा महा. आंधळ्या! हें पहा;
ख्रिस्त गेला परी क्रॉस ओला असे;
ख्रिस्त गेला परी तत्त्व मागें वसे;
ख्रिस्त गेला परी ख्रिस्त मेला नसे.
पामरा! ऐक ही गर्जुनी सांगते
रक्तभागीरथी सर्व विश्वाप्रती :
अमर हा! अमर हा! अमर हा! अमर हा!

काय केलेंस हें? मानवा! मानवा!
काय केलेंस हें? मातृभूच्या उरीं
जाहला वार हा; शांततेच्या उरीं;
मुक्ततेच्या उरीं; जाहला वार हा
मानवाच्या महा दिव्य स्वप्नावरी;
विश्वऐक्याचिया सर्व आशांवरी.
या महात्म्याचिया भग्न हृदयांतुनी
काय हें वाहतें? आंधळ्या! हे पहा :
रक्तबिंदू न हे, रक्तसिंधूच ते;
प्रलय हा! विलय हा! विश्वसंहार हा!
वार हा जाहला राष्ट्रनौकेवरी;

राष्ट्रनौका अतां भग्न झाली, तिला
या महापुरांत कोण तारणार, तारणार ?

काय केलेंस हें? प्रश्न कां हा वृथा!
मानवा! हेंच केलें तुवां सर्वदा.
रक्तहस्तें तुवां पूजिलें ईश्वरा;
रक्तहस्तें तुवां व्यापिली ही धरा;
रक्तहस्तें तुवां शमविली भूक रे;
काय केलेंस हें? प्रश्न कां हा वृथा?
काय केलेंस तें तूं न रे जाणिशी.
जीवनीं बुद्ध जो खिस्त मृत्यूमधें,
त्या महात्म्याचि ही थोर आत्माहुती
होउं दे अंतिंची. शुद्ध हौतात्म्य हें
मानवा तारुं दे; वारुं दे द्वेष नी
हारुं दे क्षुद्रता; भारुं दे भारता
पूर्ण ऐक्यें तसें दिव्य प्रेमें अतां.

पूर्वेच्या दारांतिल नंदादिप मालवला;
पूर्वेच्या कंठांतिल मंगलमणि रे तुटला;
मानवता दीन आज; सह्याद्रीशीर लीन.
आज पूर्व विधवा, अन् भारत रे पितृहीन.

रत्नागिरी
११.२.४८

# समतेचें हें तुफान उठलें

ऊठ ऊठ सह्याद्रे, घुमवित बोल मराठी खडे;
समतेचें हें तुफान उठलें; उठले सागरकडे.

हीच मराठी जिच्या मुखानें वदली ज्ञानेश्वरी;
शिवबानें तरवार घासली याच मराठीवरी;
हिच्या स्वागतासाठीं झडले तोफांचे चौघडे.

टिळक, गोखले, फुले, रानडे, आगरकर वैखरी—
स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी;
ह्या ज्योतीवर दीप पेटवा चला भविष्याकडे.

स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्यें मिळे,
तेच मराठे आम्ही; आम्ही सह्याद्रीचे सुळे;
स्वराज्यांतुनी पुढें चला रे, चला सुराज्याकडे.

दर्याच्या भरतीच्या लाटा महाराष्ट्रअंगना
कंकणनादा भिउनि तयांच्या शत्रु सोडिती रणा;
वीज माळुनी वेणीवरतीं त्याही घुसल्या पुढें.

ऊठ खेडुता, पुन्हां एकदां झाडुनियां घोंगडी;
ऊठ मजूरा, पुन्हां मारण्या आघाडीवर उडी;
एकजूट ही पाहुन पडतिल अन्यायाला तडे.

रत्नागिरी, मुंबई

## पवित्र मजला

पवित्र मजला जळजळीत ती
भूक श्रमांतुन पोसवणारी;
पवित्र मजला दगडी निद्रा
दगडाची दुलई करणारी;

पवित्र उपभोगाची इच्छा;
पवित्र मज शरिराचें जीवन;
पवित्र तुसड्या वैराग्याहुन
प्रीतीच्या धुंदींतिल मीलन;

पवित्र मज यंत्राची धडधड
समाजहृदयांतिल हे ठोके;
पवित्र मजला सत्यासाठीं
धडपडणारें स्वतंत्र डोकें;

पवित्र सुखदुःखाचीं गाणीं
वेदांतिल साऱ्या मंत्रांहुन;
पवित्र साधा मानवप्राणी
श्रीरामाहुन, श्रीकृष्णाहुन;

पवित्र मज पोलादी ठोसा
अन्यायाच्या छातीवरचा,
पवित्र मजला आणिक गहिंवर
माणुसकीचा, माणुसकीचा.

रत्नागिरी
२८.१०.४९

# ब्रह्म जाहलें वामन

ब्रह्म जाहलें वामन;
        याचितसे तीन पदें;
मला माझ्या हृदयाचें
        दार आतां उघडूं दे.

भग्न गोकुळांत शिरे
        हाडकुळा कृष्णकाना;
आज माझा गा आनंद
        माझ्या अंतरीं मावेना.

ब्रह्म जाहलें वामन
        घामामध्यें लागे न्हाऊं;
आज मला भेटले गा
        सांडलेले माझे भाऊ.

रत्नागिरी
११.५.५०

# जगण्यामध्यें ब्रह्मानंद

बरगड्यांच्या तुरुंगांतून
मीं हृदयाला मुक्त केलें;
जिथें जिथें धमनी आहे
तिथें माझें रक्त गेलें.

दिक्कालाच्या जबड्यामधील
लवलवणारी जीभ मी;
आसक्तीच्या गर्भामधील
धगधगणारें बीज मी.

माझ्या हातांत महायंत्र;
माझ्या मुखांत महामंत्र :

सगळे मिळून सगळ्यांसाठीं
मरण्यांतही मौज आहे;
सगळे मिळून सगळ्यांसाठीं
जगण्यामध्यें ब्रह्मानंद.

कागल
८.९.५०

## मानवांनो आंत या रे

पर्वतांनो दूर व्हा रे! सागरांनो दूर व्हा रे!
उघडिलें मीं दार माझें; मानवांनो आंत या रे.

वादळांची काय भीती?
तींच माझें गीत गाती.
वादळांना जन्म देती श्वास माझे पेटणारे.

भूक माझी वाढलेली;
प्राण माझा वाढलेला;
वाढलेले पंख माझे या नभीं ना मावणारे.

कालसर्पाला अतां मी
जिंकिलें जाऊन व्योमीं!
वीज ही रे चोंच माझी, मेघ हे माझीं पिसें रे.

आज माझा देह साधी
विश्वऐक्याची समाधी;
कोंडले जातील आतां मानवा या कोंडणारे.

दुर्बलांना, दुःखितांना,
शापितांना, शोषितांना,
आज क्षितिजाच्या करांनीं देत मी आलिंगना रे.

कागल
१९५१

## विश्वरूप

एक पाय नरकांत नि
एक पाय पृथ्वीवर;
कवटाळित स्वर्गाला
लोखंडी माझे कर;

सुखदुःखांचे सागर
अंतरांत साठवले;
पाप-पुण्य तुंग गिरी
स्कंधावर सांवरले;

कोटि-सूर्य-तेजाचें
सत्य नवें मन्मनांत;
कोटि-प्रीति-चंद्रांचें
चांदणेंच लोचनांत;

अंगुलींत अणुशक्ति;
तर्जनींत यंत्रदळें;
वैजयंति संस्कृतिची;
भव्यकला कर्णफुलें;

आणिक तोंडांत वेद
विजयोत्सुक क्रांतीचे;
डोक्यावर चिरभूषण
साम्ययुगी शांतीचें.

—निश्चित हो; नव पार्था,
    दोहिंकडे दोन युगें;
नव-मानव ‘ मी ’; माझें
    विश्वरूप पाहुनि घे.

## जयगोपाळ

दुकान बंद!
दुकान बंद!
वाघळासारखें
लोंबत राहतें
भक्कम कुलुप
अक्कलमंद!

मागच्या दारानें
शिरतात आंत
अंधारांत
दोन देह,
ज्यांना चढलें
दुसरें बाळसें;
करतात कुजबुज
हलक्या आवाजांत;
ठरतो सौदा
आणि घडतो
लक्ष्मीशीं व्यभिचार!

बोडकीं, बोडकीं
नोटांचीं पुडकीं
करतात प्रवास
खिशांतून खिशाकडे:
समाज-रक्तांतील
पेशींची हलचाल!

पडतात बाहेर
साखरेचीं पोतीं
लाजत, लाजत,
मागच्या दारानें;
आपल्या भारानें
मानवी कण्यांच्या
करीत धनुकल्या!

होतात गडप
दुर्भेद्य काळोखांत.
आणि नंतर
हेंही दार
होतें बंद!
वाघळासारखें
लोंबत राहतें
भक्कम कुलुप
अक्कलमंद!

ऐकत, ऐकत,
अंधारांत विरणारे
साळसूद स्वर :
जयगोपाळ!
जयगोपाळ!

कागल

## मृत्यूलाही लाज आहे

जिव्हेवरची चव गेली;
डोळ्यामधली भावली मेली;
नाडीमध्यें पडला खंड;
कमरेखालीं सगळें थंड :
उबग झाली; काय फिकीर !
धरा धीर; धरा धीर.
उबगेवर इलाज आहे;
मृत्यूलाही लाज आहे !

न्हालेलीचे ओले केस,
समुद्राचा सफेद फेस;
बालकांचे गुब्रे गाल,
जांबीवरचे जांबू लाल;
शाळ्यामधला जीवनरस,
हापूस आंबे, कापे फणस,
मंद मंद रातराणी,
धुंद धुंद गोड गाणीं,
अश्वत्थाचीं पाळें सात,
थोडा चुना, थोडा कात;
आत्मा खल, जाणिव बत्ता,
(यांच्यावरतीं बसव सत्ता)
अवघें विश्व खलांत भर;
ढवळ, ढवळ, काढा कर !

आतां सांगतों पथ्यें सारीं;
शाकाहारी, मांसाहारी;

—घट्ट दहीं; जिरगा भात;
सात भाज्या; चटण्या सात;
—तुपाळ पुलाव; रसाळ नळी;
पाण्यामध्यें गुलाबकळी;
संगित चिवडा कोल्हापुरी;
पुण्यामधली मिसळ बरी;
निदान निदान हें मिळेल :
मुंबईची मवाळ भेळ.
जगण्यामध्यें पाहिजे अर्थ;
पथ्याशिवाय औषध व्यर्थ !

पाहिजे व्यायाम निदान थोडा;
(खुर्चीचा हा सोड खोडा.)
हिरवे हिरवे अफाट माळ,
यांच्यावरून रांगे काळ;
भुरे डोंगर, निळें आकाश,
लाल क्षितिजें, पिंगट प्रकाश;
कर सैल तुमान तंग;
मातीवरतीं घास अंग;
हिरव्या गवतावरचा माज
चढेल त्याला कसली लाज ?
घामामध्यें भिजव माती;
दगडासंगें झुजव छाती;
आकाशावर मार मूठ;
उबगविबग सर्व झूट !
अजूनही आशा आहे;
उबगेवर इलाज आहे;
मृत्यूलाही लाज आहे !

कागल

# अश्वत्थामाच ठरला चिरंजीव !

ऐन रात्रींच
लुकलुकणाऱ्या
हिरवट डोळ्यांनीं
कागदावरील
पासल्या पृथ्वीवर
रोखिली दृष्टि;
आणि घेतला
निकाली निर्णय.

दणकट रणगाडे
...धडधडणारे
रांगत रांगत
ओसाड टेकडीच्या
शिरले कुशींत;
फोडीत टाहो
तोफांच्या तोंडांनीं :
'रक्त दे';
'रक्त दे'.

दचकून किंचाळला
जवळच्या खेड्यांत
कोवळा सांगाडा
क्षयी अस्थींच्या
निःसत्त्व कुशींत;
आणि शिरली

( सुप्त मनाच्या
सहजप्रेरणेनें )
उपाशी ओठांत
जिवंत कातड्याची
विशविशीत पिशवी.

विजयी सेनेची
...उगवत्या रवीला
झडली सलामी !
उगवला सूर्य
...लाजत लाजत
लाल लाल;
कारण शेवटीं
अश्वत्थामाच
ठरला चिरंजीव !

कागल

## टांकसाळ ती मनांत हसते

महागाईचे पिवळे डोळे,
केस रेशमी, पिकलेले स्तन,
उंच मान अन् टंच पोटऱ्या,
नाण्यांनीं भरलेलें खोंचण.

स्वस्ताई ही मवाळ, दांभिक;
शिळया दिलाची आणिक वंध्या;
नजर टाचकी, बोजड कंबर,
शरिरावरतीं निव्वळ चिंध्या.

तीही अगतिक, हीही अगतिक,
नपुंसकांच्या ह्या तर रांडा;
उंच हवेलीजवळुन जाई
बुभुक्षितांचा भयाण तांडा.

बुभुक्षितांचा भयाण तांडा
भीक मागतो दोन्ही वेळीं;
—टांकसाळ ती मनांत हसते,
मनांत हसते उंच हवेली.

कागल
१७.३.५२

## सब् घोडे बारा टक्के

जितकीं डोकीं तितकीं मतें;
जितकीं शितें तितकीं भुतें;
कोणी मवाळ, कोणी जहाल;
कोणी सफेत, कोणी लाल;
कोणी लठ्ठ, कोणी मठ्ठ;
कोणी ढिले, कोणी घट्ट;
कोणी कच्चे, कोणी पक्के;
सब् घोडे बारा टक्के !

गोड गोड जुन्या थापा;
(तुम्ही पेरा, तुम्ही कापा)
जुन्या आशा, नवा चंग;
जुनीं स्वप्नें, नवा भंग;
तुम्ही तरी करणार काय;
आम्ही तरी करणार काय;
त्याच त्याच खड्ड्यामध्यें
पुन्हां पुन्हां तोच पाय.
जुना माल, नवे शिक्के;
सब् घोडे बारा टक्के !

जिकडे सत्ता तिकडे पोळी;
जिकडे सत्य तिकडे गोळी;
(जिकडे टक्के तिकडे टोळी)
ज्याचा पैसा त्याची सत्ता;
पुन्हां पुन्हां हाच कित्ता.
पुन्हां पुन्हां जुनाच स्वार;

मंद घोडा, अंध स्वार.
याच्या लत्ता, त्याचे बुक्के;
सब् घोडे बारा टक्के!

सब् घोडे! चंदी कमी;
कोण देईल त्याची हमी?
डोक्यावरतीं छप्पर तरी
कोण देइल माझा हरी?
कोणी तरी 'देइन' म्हणा;
मीच फसविन माझ्या मना!
भुकेपेक्षां भ्रम बरा;
कोण खोटा, कोण खरा?
कोणी तिऱ्या, कोणी छक्के.
सब् घोडे बारा टक्के.

कागल
५.४.५२

## हेंचि दान दे गा देवा

दुर्बुद्धी दे मला थोडी;
सुबुद्धी दे समर्थांना.
केलेल्याचें मिळो कांहीं;
रुपयाचा मिळो आणा.

दारिद्र्याची स्थिती येतां
प्रेमळांचा टळो त्रागा;
हांजी हांजी करोनीही
जगण्याला मिळो जागा.

पुढाऱ्यांना नको मृत्यू
स्मारकांचा टळो फंड;
माझ्यासाठीं महात्म्यांचा
नको त्याग, नको बंड.

वरिष्ठानें शिव्या देतां
तोंड माझें बसो चूप;
महिन्याच्या शेवटाला
रूपयाचें दिसो रूप.

उधारीची असो सोय;
मध्यान्हीला मिळो कर्ज;
बेकारीची कृपा होतां
वशिल्यानें फळो अर्ज.

देणारा तूं दयावंत !
        घेणारा मी असा कष्टी;
दुःखावरी नको डाग :
        अमृताची नको वृष्टी.

कागल
९·४·५२

## मजूर

धुरकटलेल्या गिरणविभागीं जे जे मानव जाती
दृश्य तयांना एकच भीषण दिसतें:
मजुरांच्या शरिरांचा घालुन नित्य नवा तंबाखू
चिलमी ओढित गिरण्या साऱ्या बसल्या!

भों ऽ ऽ ऽ ऽ ऽ ऽ
गिरणीचा हा उंच स्वरांतिल टाहो
पडतां कानांवरतीं
मजूर—वा हाडांचा पुतळा—जातो कामावरतीं.
पहा,—जयांचे धजतिल बघण्या डोळे—
प्रेत कसें हें चाले आणिक बोले?
शक्तीवाचुन शरीर आणिक स्फूर्तीवाचुन डोकें,
चैतन्याविण जीवन आणिक इच्छेवाचुन क्रीया.
माणुसकीविण माणुस आणिक आत्म्यावाचुन प्राणी;
आशेवाचुन भविष्य ज्याचा पुढला,
मधुर स्मृतीविण भूत जयाचा गेला.
विश्वांत न या विकृति याहुन भेसुर!
विक्रम असला सैतानाला कधीं न साधायाचा!
श्रीमंताचा स्वर्ग रचाया नरक बने मजुराचा!!

मजुरांच्या हाडांचा येथें जळतो अंगार सदा;
मजुरांच्या घामाच्या वाफेवर फिरती हीं यंत्रें;
मजुरांचे पिंजुनियां स्नायू सूत इथें हें निघतें;
मजुरांच्या रक्ताच्या रंगानें तें सुंदर होतें.
आणिक त्यांच्या या त्यागास्तव मौलिक
झग झग झग झग झग झग

घरघरणारीं चक्रें म्हणती भीषण मंत्र वधाचे.
थरथरते ही भूमी खालीं—पाप तिला हें जाचे.
डोळस असुनी कशी नसावी दृष्टी?
मानवनिर्मित या सृष्टींतच मानव कां हो कष्टी?
मानव पिळितो मानवं.
हा नरमेध कुणास्तव? बोला, हा नरमेध कुणास्तव?
या अग्नींतच जळतां जळतां कां हा अंत तयाचा?
त्याग कुणास्तव? आणिक त्याग कुणाचा?
श्रीमंतांचा स्वर्ग रचाया नरक बने मजुरांचा!!

भों ऽऽऽऽऽऽ
सात वाजले, आणिक गिरणी सुटली;
तुरुंगांतुनी स्मशानाकडे त्याची स्वारी वळली,
हें आलें त्याचें घर :
छे! नच त्याचें! घाणीचें घर :
डांसांचें घर, प्लेगाचें घर, रोगट जंतूंचें घर!!
ना त्याचें घर!!
मृत्यूची ही प्रयोगशाळा भेसुर!
अज्ञानाचें हें घर आणिक दारिद्र्याचें मंदिर!
अज्ञानाचा दरिद्रतेसह संसार इथें चाले,
पहा तयांच्या भवतीं
एक दोन ना, अगणित पोरेंबाळें :
कर्जें, चोऱ्या, तंटे, दारू, जुगार आणि अनीती.
स्मशानरूपी घरांत ऐशा शिरतां सायंकाळीं
काय तयाच्या भाळीं!
आजारी पोरांचें कुथणें, रडणें, पिरपिर सारी;
अर्धनग्न नी अर्धउपाशी पत्नींच्या तक्रारी;
'लुगडें गेलें', 'मीठ संपलें', 'फणफणल्या या पोरी'
स्मशानरूपी घरांत ऐशा शिरतां सायंकाळीं

काय तयाच्या भाळीं!
अंधार...अंधार...अंधार...
जाब जगाला द्यायाचा या दारुण अंधाराचा,
श्रीमंताचा स्वर्ग रचाया नरक बने मजुरांचा.

करकर, करकर, करकर...
आवाज निघे, पडला हा खाटेवर,
गिरणींतिल यंत्रांचीं भूतें डोक्यांत अतां शिरती,
भणभण फिरती, खदखद हसती आणिक मेंदू खाती;
पिसाळलेला कुत्रा चावुन वेडा होइल जैसा,
त्रस्त आणखी ग्रस्त जाहला तैसा.
विश्रांती नच याला;
बिछान्यावरी पिसाट त्या भूतांशीं झगडुन थकला.
करकर, करकर, करकर...
पहा उठे हा, सोडुनियां जाई घर
पत्नीचा सारुनियां बाजूला कर;
—रडत राहुं दे पत्नी, कोठें सुसाट जाई हा नर?
दुर्गंधानें भरलेल्या अन् अंधाऱ्या गल्लींतच,
चिखला तुडवित कचकच,
शिरला हा नर; आणिक गुत्तेवाला
स्वस्त गांवठी दारूचा मग भरितो एकच प्याला.
या एका पेल्यांतच
निराश अपुलें जीवन सारें कोळुन
परमेशासह सैतानाचें रक्त करी तो प्राशन.
या पेल्यावर तरतें सारें सुखसर्वस्व तयाचें!
या वेळीं तो गुलाम ना कोणाचा—
श्रीमंताचा, सद्धर्माचा, घरचा वा स्वतःचा;
आयुष्यांतिल मुक्तीचा क्षण एकच
या पेल्यांतच!

या पेल्यांतच बुडतां बुडतां
स्वर्गसुखाचा—क्षणिक असो तो—आभास तया होतो.
आणिक नंतर असाच एके दिवशीं
गुंगत अथवा झिंगत, शोधित जातो तो अपुलें घर—
जें नच त्याला गवसे या भूमीवर.
या पेल्यांतच बुडतां बुडतां शेवट होतो त्याचा.
श्रीमंताचा स्वर्ग रचाया नरक बने मजुरांचा !

तासगांव.
२०.३.४४

जळता कडक उन्हाळा होता डागित त्रिभुवन सारें.
वृक्षलताही फेंकुनि देती पानांचीं प्रावरणें.
अंगाची मम होते लाही लाही;
घामानें तर सचैल स्नानच होई;
नम्न होउनी वाटे जाउन नदींत त्या डुंबावें.
कोंदटलेल्या खोलीच्या मज वाटे
वाऱ्यासाठीं भिंती उडवुन द्याव्या.
झोंप न येई म्हणुनी
खिडकीजवळी बसुनी
‘स्री’चीं चाळित—काव्यें वगळुन—पानें
ऐकत होतों बर्फविक्याचें दुःसह कर्कश गाणें !

सहज पाहिलें भिंतीच्या भोंकांतुन :
मळका मुकटा नेसुन,
हातामध्यें पळिपन्पात्री घेउन,
थुलथुलत्या धोंदांतच लपवित खोंचण,
...धोंदांतच त्या लुप्त जाहली बेंबी श्रीसीतेसम,
देत डरारा ढेकर,
वीर परत तो प्रयोजनाहुन दुर्धर
वामकुक्षि करण्याला देण्या ताणुन;
पळिपन्पात्री ताल धरितसे वाजुन कणकणकणकण.
आकाशांतुन भास्कर अग्नी ओके;
त्या तेजानें डोक्यावरचें टक्कल गोल चकाके.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०५४८
(स्थल प्रत)
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...दि: ...
...नों: दि: ...

तप्त तव्यासम जळत्या त्या रस्त्यावर
झरझर तोडित अंतर, जरि अनवाणी,
अर्धवयाची निसर्गकन्या वडारमाता कोणी
'पाटा-वरवंटा घ्या आई' ऐसें घोषित जाई.
तुक्तुकीत अन् तुफान मांड्यांवरतीं
वस्त्र फाटकें भिडलें कमरेभंवतीं;
शाळिग्रामासम तकतकती सतेज काळी कांती.
उभारलेल्या मुक्त स्तनांवर रुळते काळी माळा;
गळ्यांतल्या झोळींतिल बालक करितें तिजशीं चाळा.
झोळीखालीं सहजच दृष्टी जाई :
नव्या जीवनाच्या ओझ्याची उदर देतसे ग्वाही.
कृत्रिम आभासांना भेदुन सत्य विश्व पहाणारी
नजर पुढारी निश्चित आणि करारी.
काळ्या दगडांचा पाटा अन् वरवंटा डोक्यावर
घाम निथळतो डोक्यापासुन भूवर :
सह्याद्रीच्या कृष्ण कड्यांतुन कृष्णा वाहत का ही ?
भालावरच्या आंख्या अथवा दऱ्याच भिजवित जाई.
शरिरांतिल अन् बाहेरिल ओझ्यानें
दिसते उग्र मुखावर
स्नायूंचें आकसणें आणिक ताठण,
नाकपुड्यांचें श्वासाकरितां आकुंचन नी प्रसरण.
'पाटा-वरवंटा घ्या हो' येती स्वर;
एक हात त्या पाट्या-वरवंट्यावर
आणिक दुसरा झोळीच्या खोळीवर.
ऊर उडे झोळीसह आणिक बालक झुलतें त्यावर.

विचार गेले मनांत नाना येऊन;
दृश्य पाहतां गळली 'स्त्री' हातांतुन;

विसरून गेलों थिल्लर नटवें मीपण;
सुखदुःखाच्या कृत्रिम आभासा पण.
दिव्य दृश्य जें माझ्यापुढतीं थाटे,
पाहुनि तें मज श्रमदेवीचा साक्षात्कारच वाटे.

तासगांव

# कीर्तन

नवीन मी त्या गांवीं;
वेळ कसा मग जावा !
एक न होई नाटक; येई डप्फर क्वचित सिनेमा.
तो नच माझ्या कामा.
त्यांतुन होतें केलेलें आमंत्रण;
उगाच कां मग, सांगा, मोडावें मन ?
म्हणून गेलों शोधित विष्णूमंदिर
कीर्तन जेथें हणमुबुवांचें खासें आणिक सुंदर.

" जयराम, जयराम, श्रीराम, जयराम "
" धिन् धिन् धा तिन् त्रक धिन् धागि त्रक "
भजन सुरू तर झालें.
उभें राहिलें कीर्तन.
प्रसिद्ध आणिक कर्मठ वतनी बूवा,
होते जरि म्हातारे,
अस्सल ते गाणारे :
तोंड वाकडें करुनी फिरवित आकाशांतुन डोळे,
उलट्या तानेचें मग देती फेकुनियां भेंडोळें.
गुरव साथिचा पट्टीचा बजवय्या
साधाया सम मारित मुखडा तुकडा अथवा तिय्या, कधीं न साधा !
धा तिरकिट तक् ता तिरकिट तक् ग्ड़ां धा ग्ड़ां धा ग्ड़ां धा !

बूवांपुढले महाप्रतिष्ठित, वकील, डॉक्टर, सज्जन,
करीत असती धंद्याचें संभाषण :
" शहर असें हें भिकार आणिक छोटें,
इथें न कोणी धनीक मोठे वाणी !

लोक शानटी !—क्वचित भांडती वा पडती आजारी ! ”
अर्धवयाचे गृहस्थ गांभिर्यानें
महर्गतेचीं वा युद्धाचीं करिती नव अनुमानें.
तरुण मंडळी विद्यार्थ्यांतिल कांहीं,
मांडीवरतीं दावित गायन-ठेका,
तिरप्या आणिक आतुरशा नजरेनें
निरखित असती तरुण मुलींतिल सुंदर जी फुलराणी.

“ जयराम, जयराम, श्रीराम, जयराम ”
“ धिं धिं धा तिन् त्रक धिं धागि त्रक ”
भजन सुरू मग झालें.
टाळ्या ऐकुं न येती म्हणुनी बूवा चिडुनी गेले.
पूर्वरंग मग रंगे गहन खरोखर :
“ अद्वैत असें हितकर ”
“ अद्वैत असें सगळें ”
—उपमादृष्टांतांतच बूवा बोले—
“ दोन ओठ पण वाणी एकच असते;
दोन पाय पण गति कां एकच दिसते ?
दोन कान पण श्रवणक्रीया एकच;
अद्वैताचा उगम असे द्वैतांतच.
—पितरें दोन परंतू
मूल होतसे एकच (एका वेळीं) यांत न किंतू !
विनोद सोडुन द्यावा, यांतिल तात्पर्यार्थच घ्यावा ! ”
प्रासादिक वाणीनें बूवा बोले;
मध्वमताचें खंडन आणिक शंकर-मंडन झालें.

—पुढच्या पोरांना चिमटे घेणारीं मागिल पोरें
ऐट आणिती शांतपणानें आपण ऐकत सारें !
हरिदासाच्या पुढचे मुन्सफ नूतन

तक्क्याशीं टेकुनियां असती माना डुलवित...पेंगुन.
—घुमटीमध्यें समई तेवे, ज्योती मिणमिणारी;
—नैवेद्यास्तव उंदिर घाली मूर्तीभंवतीं फेरी;
—नैवेद्याची वाटी पिउनी तांदुळ मोजि पुजारी.

“ जयराम, जयराम, श्रीराम, जयराम ”
“ धिन् धिन् धा तिन् त्रक धिन् धागि त्रक ”
पूर्वरंग झाल्यावर
दामाजीचें आख्यान झडे सुंदर.
मार्मिक आणिक तात्त्विक आणिक सात्त्विक,
सद्धर्माला सत्कार्याला प्रेरक,
दामाजीचें जीवन :
स्पष्ट उभी मग करिती नयनांपुढतीं
दामाजीची मूर्ती :
उदारता ती, मानवता ती, ती हृदयींची कळकळ;
सत्यपरायण भगवद्भक्ताच्या आत्म्याची तळमळ.
पाहुन साऱ्या मंगळवेढ्यांतिल दुष्काळ भयंकर
अन्नावांचुन, पाण्यावांचुन तडफडणारी जनता;
हालांतुन चुकवाया अपुलीं मुलें मारिती माता;
दामाजीच्या हृदया फुटला पान्हा वात्सल्याचा;
आणिक त्या कानूंचीं कुलुपें तोडुन,
कोठाराचीं दारें उघडत दामाजीच्या हातुन.
—आणिक शेवट लुटालूट धान्याची
—सुल्तानाच्या प्रचंड कोठाराची—
—काळाच्या जबड्यांतिल सगळ्या गिळलेल्या अन्नाची.
परिणाम पुढें भीषण :
सुल्तानाचें दामाजिस आमंत्रण;
बेडी आणिक तुरुंग आणिक दूषण
आणिक शेवट त्याच्या मुक्तीकरितां

स्वतः त्या विश्वंभर
श्रीविष्णूचें विठ्या महारांतिल अद्भुत रूपांतर !

कथा रंगली; बूवा तल्लिन झाले;
—खडीसाखरेसाठीं त्यांची मधेंच चुळबुळ चाले—
—संसारी बायांना छळती त्यांचीं रडवीं पोरें;
" घरीं नेउनी त्यांना निजवा " म्हणती त्यांचे नवरे.
लटलटत्या मानेचे तिन म्हातारे
कीर्तनरंगीं बुडून गेले सारे.
जख्खड म्हाताऱ्या विधवेचे सुरकुतलेले डोळे
पाण्यानें डबडबले.
बूवांच्या मागें बसलेल्या मराठमोळ्या जाती,
आसपासच्या खेड्यांतुन ज्या येती,
कीर्तन ऐकत असती;
विड्या ओढती; पानसुपारी खाती; थुंकत बसती.
मंदिरद्वाराजवळी वा बाहेरी,
पडक्या भिंतीभंवतीं,
अर्धउपाशी महार अथवा चांभार कुणी थोडे
भिंतीवरुनी पुढें झुकावुन माना
प्रयत्नपूर्वक ऐकत कीर्तन...जें ऐकाया ये ना.

कीर्तन संपत आलें;
शेवटची चिज चाले;
तोंडानें तिन येउन बूवा करिती शेवट साधा,
( तबला सुमधुर बोले )
धा धा तिरकिट धा ऽ धा धा तिरकिट धा ऽ धा धा तिरकिट धा.

तासगांव,
१९४४

## सरोज नवानगरवाली

वारावर जाण्याच्या वाटेवरतीं
सरोज राहत होती.
आठवते मज ती तिचि
जुन्या घराची
रंगवलेली खोली पडदेवाली;
जींत तिच्या त्या आयुष्याचीं अनेक वर्षें गेलीं.

रात्रीचा मी वारावर जातांना,
रोज दिसावें नयनां
दृश्य असें हें
—जें पाहत असतां मनांत मी लाजावें—
नेसुन नटवें पातळ,
आणिक सारित हातानें मउ कुंतल,
घालुनि नयनीं काजळ,
दावित मोहक नखरा,
किंचित दाबित अधरा,
आणिक खुणवित, उभी राहते वाट सदा ती पाहत.
वाट कुणाची ?
उभ्या जगाची, जो जो येइल त्याची;
आणिक कोणी
टेकीत काठी,
घालुन पगडी मोठी,
मागें-पुढतीं पाहत,
हळूच शिरतो खोलिंत खोकत खोकत.

सरोज सरते पुढतीं.
हात तिचे मग दारें लावुन घेती.

नंतर आंतुन
नाद जरासा येई नाणं वाजुन.

सकाळचा मी वारावर जातांना
रोज दिसावें नयनां
दृश्य निराळें
—जें पाहत असतां यावे हृदयिं उमाळे—
त्या दारांतच,
त्याच ठिकाणीं,
सरोज येउन बसते.
निवडित असते तांदुळ पेंगत पेंगत.
काळे, कोमल, विस्कटलेले कुंतल
पाठीवरतीं लोळत,
आणिक कुरळे
गालावरतीं खेळत.
सूप पुढें पडलेलें;
मलूल, चंचल डोळे
निवडित असती जाडेभरडे तांदुळ;
आणिक वाहत त्यांतच
नयनांतिल पाण्याचे शीतळ ओघळ.

करवीर,
२८.२.३९

# चक्रमत्ता

आहे सायकल
लागली चढणीला:
पुष्ट पोटऱ्यांच्या
गरम पायांनीं
पोलादी पायदळ
दाबीत दाबीत,
बेछूटपणानें
आहे चालली
पोर पुणेरी.

आहे सायकल
लागली चढणीला:
...लोचट, लवचीक
काळा शेपटा
लोळतो पाठीवर;
...आणि भुरटे
छचोर केस
करतात वाऱ्याशीं
नाचरे चाळे.

आहे सायकल
लागली चढणीला :
भरीव मांड्यांची
लयबद्ध हालचाल...
झुंजतात वाऱ्याशीं
टोकदार ऊर.

—लाटांना पेचणारी
होडीची नाळ...
सुटतात जोरानें
श्वासनिश्वास;
वाटतें करतात
हवाच निरोगी !

आहे सायकल
लागली चढणीला :
...सफेद इस्त्रीचे
पायघोळ लेंगे
उतारावरून
जातात घसरत;
...वळतात माना;
...खिळतात डोळे;
क्षणभंर, क्षणभर
गळतात बुरखे,
दाखवीत आपणाला
आपलेंच स्वरूप.
कारण टोचतें
अगदीं नकळत
मत्सरी मनाला
गुबगुबीत बैठकीचें
सैल सूख !

कागल

## शेवटची आगबोट

झोपाळलेली
‘ संत जनाबाई ’
झिंगत, झिंगत,
जाते झेपावत
मुंबईच्या दिशेनें;
आठवत, आठवत,
गोव्यांतील गमती;
...एकाक्ष दीपस्तंभ
मारतात डोळा!

झिंगत, झिंगत
झेपावत्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...तिसऱ्या वर्गातील
तृतियांश मानवांचीं
अर्धनग्न वस्त्रांगें
थरथरतात तक्त्यावर;
घेऊन उशाशीं
कर्मांचें गांठोडें;
आणि उराशीं
पोरांचीं कडबोळीं !
...पोत्याच्या डोक्यावरील
वाढवणीची शेंडी
दिसते पिंजारलेली !
आणि लोंबणारे
सुपाचे कान

बसतात ऐकत
गांवाकडील गप्पा,
गांवकींतील गोंधळ,
कोर्टांतील कारवाया,
कर्जानें पोखरलेल्या
काळजांची कोल्हेकुई.

झिंगत, झिंगत
झेपावत्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
घुसळते सर्वांग
मृगाच्या मस्तीनें.
...वादळी लाटांच्या
अगांतुक हेलकाव्यांनीं
कॅबिनच्या पलंगावरील
विलायती जोडप्याचा
विस्कटतो शृंगार;
आणि अडखळत्ये
शेजारच्या कॅबिनमधील
शेटजीची रामरक्षा.

झिंगत, झिंगत
झेपावत्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...चतुर्थांश पानाबरोबर
नखभर सुपारी
चघळणारा म्हातारा
करतो जुडी

शिडबिडीत शरिराची;
बसतो कोंपऱ्यांत;
आणि रापतो
कुडल्यावरील पत्र
पांच पांच मिनिटांनीं.

झिंगत, झिंगत,
झेपावल्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...पघळट नितंबांची
निर्वासित सिंधीण
जाते शोधीत
संडासाचा रस्ता;
ठेवल्ये हात
कोंकण्यांच्या डोक्यावरून,
जे ओरडतात,
'अग्ये बाय! असां काय!'

झिंगत, झिंगत
झेपावल्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...अर्ध्या इंचाचें
अंतर सोडूनच
'सोवळा'सा भटजी
घालतो अंथरूण
आपल्या सतरंजीचें;
पांघरतो धाबळी;
जिच्या भोकांतून

उमगत्ये त्याला
शेजारच्या किरिस्तावांची
गलिच्छ चाळेगत;
बदलतो कूस,
म्हणतो, 'शिव, शिव !'

झिंगत, झिंगत
झेपावत्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...जाकिटं घातलेले
चार गिरणबाबू
बसतात खेळत
रमीचा डाव;
आणि ओढतात
'शिवाजी छाप' विड्या
—विलायती जोकर
ओढतो चिरूट
त्रेपन्नाव्या पानावर !

झिंगत झिंगत
झेपावत्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...रोजगाऱ्याबरोबर
मुंबईला चाललेली
पिवळी मागारीण
सोनेरी मुलाम्याची
झुबकेदार नथ
सावरीत सावरीत

भुरकल्ये बशींतून
हिंदूची चाय;
जखडल्ये डोळे
पायांतील जोडव्याशीं

झिंगत, झिंगत
झेपावल्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...पिकलेल्या फणसांचा
गुळमट भप्कारा
जातो मिसळून
ओकण्याच्या उमशींतून;
मिसळतात ओकाऱ्या.
...अजागळ चंद्र
मारतो उड्या
विदूषकाप्रमाणें !

झिंगत झिंगत
झेपावल्ये बोट
मुंबईच्या दिशेनें;
...लाटांवर झुलणाऱ्या
भुतांच्या किल्ल्यांतील
आगीच्या भुयारांत
फिरतात कुठेंशा
मानवांच्या सांवल्या;
वाटतें, दिसतात
बोटीच्या अंतर्मनाच्या
विपरीत हालचालीच

...उमटतो हुंकार...
ज्यानें दचकत्ये
स्वयंतुष्ट बुद्धीची
तांत्रिक तटस्थता.

कागल,
१९५२

# निरोप घेतांना

सोड जाउं दे मला; हात घाल ना गळां.
दंव जयांत अश्रुचें ते गुलाब गालिचे
बावलेत; भालिं ये स्वेद-मालिका भयें.
ओठ लाल कंपती; कंपवीति मन्मती.
म्लान नेत्र जाहले; पूस आंसु आपुले.
हात घाल ना गळां; सोड जाउं दे मला

हृदय मी तुला दिलें, जें तृषार्त जाहलें;
प्राशिली सुधा परी शांतता न अंतरीं.
ध्येयहीन वाटतें हें जिणें अतां रितें.
जीवनाचि ही लता कापुं काय वाढतां ?
कीं फुलें न अर्पिलीं जोंवरी तुझ्या तळीं ?
वेल दूर चालला; सोड जाउं दे मला.

होउनी निराश मी चाललों कुठें तमीं;
तों तुवांच आसरा, प्रीतिचा तसा झरा,
देउनी वनीं मला येथ मार्ग दाविला.
आस त्यांच लाविली; आज ती फुले भली;
गंध दूर चालला; सोड जाउं दे मला.

मारिली मिठी तुला, प्रीतिनें न ज्या तुला.
तीच आज मागुनि ध्येय घेइ ओढणी.
यज्ञ दिव्य पेटला; प्राण त्यांत गुंतला;
" आहुती तयांत दे " ध्येय हें मला वदे.

आवरी रडें, गडे पाहुं या न जें दडे !
हात घाल ना गळां सोड जाउं दे मला.

मनमाड,

१९.१.४०

## एक वेढा

ती रजपूताची राजसबाला दुर्गम दुर्गाखालीं
बुरजावरुनी निरखित होती चिंतातुर मनिं झाली.
चंचल, प्रेमळ, नजरेंत तिच्या आतुरता नी भीती
होती ओढत अविरत मागें स्वैर धांवती प्रीती.
ज्या सेनेचा वेढा साचा जनकाच्या नगराला,
शिलेदार वेढा दे त्यांतिल कन्येच्या हृदयाला.

रजनीच्या काळ्या अलकांची पसरत भंवतीं छाया
तों टापांचे नाद लागले तिजला ऐकूं याया.
आनंदाच्या आंतिल लाटा फुटल्या अधरावरतीं;
दौडत दौडत खालीं आली वीरश्रीची मूर्ति.
शिलेदार तो खालुन वदला, " खोललें न कां द्वार ? "
" नाहीं, अजुनी बंदिवान मी. " वदली ती सुकुमार.
" येतों—" म्हणुनी असिला चुंबुनि गेला दौडत वीर;
तीही त्याला निरखित होती नृपबाला आतूर.

असेच गेले दिवस भराभर वदतां वारंवार
" नाहीं, अजुनी बंदिवान मी, उद्यां परी येणार ! "
प्रेमशरानें विकल होउनी झुरणारी ती तरुणी
होती एका सायंकालीं निरखित बुरुजावरुनी;
प्रियकर झरझर खोल दरींतुनि दौडत खालीं येई;
अधिर मनानें तीही त्याचीं वचनें पिउनि घेई.
आस तयाची तिला विचारी, " खोललें न का द्वार ? "
" नाहीं अजुनी बंदिवान मी, उद्यां परी येणार ! "
" आज्ञा मजला असे जावया पुढच्या स्वारीवरतीं
आज न आशा, भेट आपुली होइल केव्हां पुढतीं. "

दौडत गेला टांच मारुनी, सोडुन मागें आस;
"थांबा, थांबा—" बाला वदली सोडुनियां निःश्वास.

तो गेला; ना आला मागुति; परि ती बुरुजावरतीं
बसते हातानें रेखाटत हवेंत त्याची मूर्ती.
सायंकाळीं त्या टापांचा होतो तिजला भास.
आणिक खालीं दरींत निरखुनि सोडित ती निःश्वास.

मनमाड,
१.२.४०

## तूं व जीवन

जीवनाच्या अंधारांत
निराशेचा झंजावात;
त्यांत तूंच दिव्य ज्योत
जिवलगा !

जीवनाच्या सागरांत
वादळाचा वाहे वारा;
तूंच माझा ध्रुवतारा
जिवलगा !

जीवनाच्या या आकाशीं
जागोजाग मेघराशी;
मेघांआड तूंच शशी
जिवलगा !

जीवनाच्या रणांगणीं
सूड धावे आक्रोशत;
विजयाचें तूंच गीत
जिवलगा !

जीवनाच्या चढणीचें
कठीण रे ! आरोहण;
तूंच पाय, तूंच प्राण,
जिवलगा !

जीवनाच्या जाग्रणांत
क्षणोक्षणीं पडे भ्रांत;

तूंच एकला वेदांत
जिवलगा !

जीवनाच्या वृंदावनीं
गोप-गोपी फेर धरी;
त्यांत तूंच माझा हरी
जिवलगा !

जीवनाची बाग फुले
वृक्षवेली नाचतात;
आम्रतरू तूंच त्यांत
जिवलगा !

जीवनाची तुटे बेडी,
जाहला रे स्वर्ग खुला;
अमृताचा तूंच पेला
जिवलगा !

सांगली,
२५.११.४०

# अपुरें प्रेम

तें सापडतां, नच सापडतें;
हुरहूर अखंडच मग उरते.

तुझ्या दर्शनासाठीं आतुर
नयन जाहले; आणिक नंतर
तूं दिसतां ते मिटती सत्वर;
कां वांछित दिसतां नजर भिते ?

अखंड झुरतें तुझियासाठीं;
तूं दिसतां पण माझ्यापाठीं
मी पळतें कां ? कवणासाठीं ?
हें गूढ न माझें मज कळतें !

तुझ्याचसाठीं येतें चालुन;
तुझें टाळतें पण आलिंगन;
भास तसा क्षण होतो तो पण...
...तो अंधुक भासच...मन हरतें !

विसरुन जाशिल का मम प्रीती ?
क्षणभर संशय, क्षणभर भीती;
भीति लोपते, आणिक चित्तीं
ती नीतिच अभया आणविते !

सर्वस्वाचें न घडे मीलन;
असेंच राही अपुरें जीवन;
अनंत असतें ना अपुरेंपण ?
मी अनंत अपुरें प्रेम पितें !

# तयारी

झुंजुमुंजू जाहलें नी रंगली प्रेमांत प्राची.

ना मिळो पायांत जोडा; ना मिळो घोडा इराणी;
मार्ग जो माझ्या पुढारीं व्यापिलेला कंटकांनीं;
प्रीतिच्या धुंदींत सारीं अंतरें तोडावयाचीं.

गांठिला ना हेम राही; न्याहरीला ना मिठाई;
भूकही मेली भुकेनें; पोट हें पाठीस खाई;
प्रीतिची ताजी शिदोरी ना परी संपावयाची.

घाम तो वाहे घळाळा; होतसे तापून काळा;
पेटती बाहेर ज्वाळा; आसरा ना थांबण्याला;
हा उन्हाळा बोल कोणा प्रीतिच्या छायेंत जाची,

दीप ना विद्युत्प्रकाशी एकही माझ्या कराशीं;
पाश रात्रीच्या तमाचा धावतो देण्यास फांशीं;
कां अतां चिंता मनाला ? प्रीतिची दीप्तीच साची.

वीर ना झुंजार कोणी धीर या द्याया शिपाया;
ना अतां माता मला जी घेउनी दावील माया;
ना उणें कांहीं उरे जों संगती साथे सखीची.

गज्जलाचा एक झेला हा असूं दे हुंगण्याला;
गीतमद्याचा मिळो प्याला पिण्याला, झिंगण्याला;
आणखी झाली तयारी जीविताच्या संगराची.

करवीर,
१७.२.४१

## संशय

प्रहर जरी रात्रीचा पहिला होता,
प्राण तुझ्यास्तव भलता
आतुर आणिक अधिरा होउन गेला;
जीव निघाला,
आला तव सदनाला.

तूं नच दारीं दिसलिस;
स्वागत ना केलेंस; तुवा ना हसलीस;
प्रेम न दिसलें पहिलें;
मिटलेले दिसले तव डोळे...झोपेनें मज गमलें.
प्रेम न उरलें वाटे,
मनांत भलता संशय दाटे भीषण;
आणिक मी पण
हात तुझे ते कोमल, मोहक, मांसल
जोरानें दाबुनियां नंतर रागानें तुज वदलों,
"प्रेम झोपलें, म्हणुनी मिटले डोळे?"
हासत तूं वदलीस मला पण
घेउनि चुंबन—
"जीवन...
तुलाच होतें पाहत हें माझें मन!"

करवीर,
२२.२.४१

# विजय

मरणा!
कशास बघसी वेड्या मजला रोखुन?
काढशील का शोधुन?
लपेन मी हृदयांत प्रीतिच्या माझ्या;
लपेन मी आरक्त अशा त्या अधरीं;
लपेन मी त्या मस्त सुस्तनांमधुनी;
लपेन चंचल नयनीं आणिक घेइन भंवतीं कुंतल;
...अमर असें मी; दूर अतां पळ.

उगाच करशिल धाडस भीषण!
या रमणीचें घडतां दर्शन—
शिकशिल तूंही प्रेम कराया;
आणिक वेड्या!
मरणकला तव जाशिल विसरुन!

करवीर,
२२.२.४१

# उन्माद्

छे, अन्न कशाला? मला न त्यांतिल गोडी;
आलिंग मला; मग भूक मला नच थोडी.

हें मद्य कासया? ओठच दे तव बाले;
या विश्वावरतीं झिंगुन घेइन झोले.

कां शुष्क काळजी? मिळो, मिळो न बिछाना;
हे तंग मख्मालि ऊर उभे असतांना.

ये मत्त, कोवळे, अधीर, कोमल पोरी,
उन्मत्त काल हा; चकोर मी, तुं चकोरी!

करवीर,
२३.२.४१

# लाज

लाज ना मला मुळींच, बोल हे तुझे खरें;
लाज मावते मनीं न प्रेम जोंवरी भरे !

देख जा, तडागस्थानिं पंकजासि चुंबि आणि
भृंग गाइ गोड गाणिं; ना मुकाच वावरे !

रम्य दाटशा वनांत वेल जी फुले भरांत;
आम्र घेत ती करांत, पाहती जरी झरे !

देख हा कसा गिरीश घेउनी उरीं दरीस
दाखवी उभ्या जगास; लाज कां बरें नुरे ?

भेटतां शशीकलेस भान कोठ सागरास ?
प्रेमगीत गर्जण्यांत, नाचण्यांत ना हरे !

मेघराज राजरोस मारुनी मिठी विजेस,
सांगतो न का जगास प्रेम जें मनीं स्फुरे ?

जा, अतां पहा प्रभात; येउनी रवी नभांत
ओढतो धरा करांत; भीनि भ्याड पामरें !

प्रेम थोर पुण्यकर्म; प्रेम हा सुदिव्य धर्म !
लाज भीतिचेंच कर्म; प्रेम कां तिला डरे ?

करवीर,
२३.२.४१

# तूं गातेस तेव्हां

मोकळा गळा तुझा गात गीत जोंवरी,
तोंवरी सुधा न गोड, अमृता न माधुरी.
गान हें तुझें असे? गान वा मला दिसे?
कांहिंही असो कसें; दिव्यता असे खरी!
शास्त्र जाणिशी न वा; प्रश्न हा कुणा हवा?
शस्त्र हें असें तुवां योजितेस जोंवरी.
गा असेंच गीत खोल; प्रीतिचा धरीन ताल;
योग्य हा वसंतकाळ गावया असावरी.

येउं दे शिशीर जीर्ण; दाटुं दे तिमीर पूर्ण;
दाद दे तयास कोण? गीतमद्य दे परी.
वेळ कां वृथा गमे? काळही इथें रमे!
या पुढें धिमेधिमे सोडि वृत्ति धावरी.
वाटतें कुठें तरी तूं नि मी बरोबरी,
रातराणिच्या घरीं, तारका शिरावरी;
मी विहंगमासमान, चाललों कुठें उडून,
पंख हे तुझेंच गान; ही तुझीच हुन्नरी.

पाहिला क्षणीं प्रकाश, तिमिरही क्षणाक्षणास;
जाहले अनेक भास; रंगली विभावरी.
लोपला विकल्प पूर्ण; जाहलेंहि विश्व शून्य;
गानयोग धन्य धन्य साधलाच अंतरीं.
जीवनाचिया कळ्या उघडती न पाकळ्या;
उमलल्या नि हांसल्या; तूं प्रभात साजरी.
घेउनि रित्या जिण्यास लाविलें जरी मुखास,
त्यांत अर्थ ओतण्यास शक्त तूंच भूवरी.

गीतजाल फेंकलेंस आणि ओढिलें जिवास;
ठेव गे ! मला तसेंच... बंधनांत माधुरी.
सोडुनी स्वभावतोल चाललों उगाच खोल;
राहिलें वरी अमोल पद्म कीं जलावरी.
संपतांच गीतरंग, याचितों स्मृतीतरंग;
होउनी तयांत दंग रंगवीत शर्वरी.
मोकळा गळा तुझा गात गीत जोंवरी
तोंवरी सुधा न गोड; अमृता न माधुरी !

# रक्तसमाधि

विचार–वाचन–व्याख्यानांनीं होउन वेडे आपण
खेडें शोधत गेलों;
आणिक शेवट आलों धावत जेथें
आकाश निळें वरतीं;
आपण भूमीवरतीं;
हिरवळ अपुल्याभंवतीं;
आणिक देवीच्या राईंतिल पक्षी कुजबुज करिती.

आतुरतेनें सकंप होउन आलिस तूं मग जवळी
आणिक त्या वेळीं ! त्या अद्भुत कालीं ! !
अर्धोन्मीलित काळ्या डोळ्यांतुनियां
त्याहुन काळी उफाळली मग ज्वाळा;
गाल बोलले; नेत्र बोलले; ओठ बोलले; एकच ' माला...माला. '
केस तुझे सुटलेले पाठीवरतीं;
उभारलेले स्तन टवटवते पुढती;
आणिक त्या उन्मादक
भरिव नितंबाच्या भंवतींच्या नीटस रेषा मोहक;
नितंब गोरे, मृदुल, गोल नी मांसल;
मस्त, पुष्ट, मादक मांड्या थरथरती;
विवस्त्र झालेली तव कंबर माझ्या पुढतीं झुलती.

हृदयाजवळी घट्ट घेउनी आवळतांना तुजला
देह जाहला घामानें मग ओला;
तीव्र, गूढ निःश्वसनें
गाउं लागलीं अनंत अपुरें गाणें;
रक्त लागलें नाचूं आणिक गाऊं;

मृत्यूंतुनही अमर लागलें होऊं;
जिवाजिवांच्या तारा साऱ्या जुळल्या;
संगितलहरी उठल्या रुधिरामधुनी;
जुन्या काळचीं नव्या सुरांतुन गाउं लागलों गाणीं;
तुझ्यांत गेलों, विरलों, आणिक मेलों;
मजला पाजुन, तुजला गिळलों, प्यालों;
मीपण गेलें; तूंपण आलें...आलें,
जीवन संगित झालें, जीवन प्यालें !

अव्यक्ताला व्यक्त करायासाठीं
अद्वैतांतच विरल्या साऱ्या गांठी;
विसरुनि गेलों अद्वैतांतच मीपण,
स्वत्वाचें संरक्षण;
आणिक त्या आत्यंतिक अद्भुत वेळीं
दिक्कालाची बेडी भंगुन गेली.
रक्तसमाधिंत दिव्य रवानें वदलों जेव्हां दोघें
तूं–"ये...ये...", मी–"घे...घे...";
रक्तसमाधी लागुन विरली माया;
रक्तांतुनियां रक्त मिसळलें जीवन पुढतीं न्याया !

करवीर
१२.२.४३

## पुनर्मीलन

सोडुनी गेलों तुला मी दूर गे देशांतरीं;
धावलों, ठेचाळलों, नी पातलों तूझ्या घरीं.
हावरीं भेसूर सारीं भोंवतालीं श्वापदें;
चोरटी चाहूल लागे, वाजती त्यांचीं पदें.
देह सारा फाडतांना जीव जीं ना पाहती,
देखती फाडून डोळे, तीं गिधाडें भोवतीं.
कृष्णमेघाच्छादनानें—मृत्युची वाटे रखेली—
ती निशा माझ्या सभोंतीं, तूं पुढें अन् झोंपलेली.
ही तुझी निद्रा इमानी मूढ मी अव्हेर मानी;
जींत स्वप्नें रंगलेलीं भंगलेल्या मत्स्मृतींनीं.
एकटी टाकून तूला खिन्नशा वेड्या मनानें
चाललों धुंदीत गल्ल्या, देवळें, नी दाट रानें.
कीर्तिचें किंवा स्तुतीचें घेउनी खोटेंच नाणें,
मी जगाला अर्पिलें त्वत्प्रीतिचें तें गूढ गाणें.
मांडिला बाजार तूझा स्वार्थहेतूनें जगीं;
स्फुंदला आत्मा तरीही ना तया केलें उगी.
अमृताचे घोट थुंकी आणि फुंकी जो चिमा,
उत्पलाला लाथ हाणी आणि झेली कर्दमा,
भाग्यशाली तो अभागी, तो दरिद्री इंद्र मी;
जाणिलें हें आज आणी त्वत्पदांना मी नमीं.
दिव्य तूझ्या पादस्पर्शें निर्जिवाला जीव यावा;
दिव्य तूझ्या दृष्टिपातें आंधळा द्रष्टा बनावा;
दिव्य तूझ्या प्रेरणेनें चारि वेदांनीं वदावें;
दिव्य तूझ्या संगतीनें पामरानें मुक्त व्हावें;
त्या तुला सोडून गेलों दूर मी देशांतरीं;

धावलों, ठेचाळलों, नी पातलों तूझ्या घरीं;
हात हा दारावरी नी लोचनें आतूर गे;
दे तुझ्या गे दर्शनाला; तार गे वा मार गे.

तासगांव
२८.१२.४३

# अन् पहिल्या भेटींतच

अन् पहिल्या भेटींतच
  तूं मजला, मीं तुजला,
गूढपणें गूढपणें
  मूक भाव सांगितला.

छातीवर खेळवितां
  वेणीचे पेड बळें,
गुंफलींस त्यांत तुवां
  दोन नवीं अग्रफुलें !

आरशांत नजर तुझी
  पाहि दुजें कांहिं तरी;
आळविशी तीच तीच
  कॉफींतिल कां ठुमरी.

ठुमरीची रंगत त्या
  मज न कळे; पण सोपी
मानेंतिल मुरकी अन्
  डोळ्यांतिल आलापी.

अन् पहिल्या भेटींतच
  मीं तुजला, तूं मजला
मूकपणें, मूकपणें,
  गूढ भाव सांगितला.

रत्नागिरी
२३.१०.४९

## नुकतें नुकतें

नुकतें होतें नजरेंत तुझ्या
  दिसूं लागलें अवखळ पाणी;
नुकतीं होतीं तुझ्या जिभेवर
  नाचुं लागलीं अल्लड गाणीं;

नुकते होते सुरू जाहले
  लाजेचे पदराशीं चाळे;
नुकते नकळत वितळत होते
  भाव निरंकुश साधेभोळे;

नुकतें नुकतें होतिस शिकलिस
  ओठ दाबण्या दांतांखालीं !
नुकत्या नुकत्या मीही होतों
  जुळवित पहिल्यावहिल्या ओळी !

पहिल्यावहिल्या त्या ओळींतिल
  कुणासही नच कांहीं रुचतें;
आठवतां पण त्या माझें मन
  मध्येंच झुरतें; मध्येंच फुलतें !

रत्नागिरी
२५.१०.४९

## मला तुला नच फुलवायाची

मला तुच नच फुलवायाची
   लावुनियां माझा पापी कर;
मला तुला नच विझवायाची
   प्रीतीचा घालुनियां फुंकर;

मला तुला नच सुखवायाचें
   शाप जगाचे माथीं ठेवुन;
मला तुला नच दुखवायाचें;
   ...असेंच दुखरें, दुबळें हें मन.

अशा मनाला फक्त असावी
   जखम विसरत्या आठवणीवर;
मला तुला नच फुलवायाची
   लावुनियां माझा पापी कर.

रत्नागिरी
३०.१०.४०

# तुझ्या देहाचीच ज्योत

पहाटेची गोड थंडी
   गुदगुल्या करीतसे;
पहाटेचें वेडें स्वप्न
   भुवयांत लपतसे.

पहाटेच्या चादरीची
   खुपतसे मिठी सुकी;
तळमळ करताती
   वासनांचीं पिलें भुकीं.

खिडकीच्या बाहेरून
   आंत हेरतें चांदणें;
आणि उशी माझ्या कांहीं
   कानामध्यें गुणगुणे.

मींही पाहिलें बाहेर;
   आणि दिसे आभासांत :
चांदण्याच्या पणतींत
   तुझ्या देहाचीच ज्योत.

रत्नागिरी

## वाट तुझी पाहतसे

सरली सर; भरभर हा
  पूर अतां ओसरला;
आकुंचित झालि नदी;
  ओढ्यांचा मद सरला.

पर्जन्यानंतर या
  सुस्नाता रात्र असे;
स्वप्नांच्या बाळांस्तव
  मातृत्वा याचितसे.

रजनीच्या केसांतिल
  केवडा गमे बिजली;
दिवसाला भेटाया
  रजनी वधू ही सजली.

तेजाचें आराधन
  चोहिकडे चालतसे;
मी जीवितपूर्तीस्तव
  वाट तुझी पाहतसें.

रत्नागिरी

# वेध

असशील का अतां तूं
  बसलीस अंगणांत ?
अन् हात दोन चिमणे
  असतील का गळ्यांत ?

असशील का अतां तूं
  अंगाइ-गीत गात
घेऊन लाडकीला
  त्या लाघवी कुशींत ?

फोडीत का कढीची
  असशील पाळ नामी ?
कीं काउच्या घराच्या
  तूं गुंतलीस कामीं ?

मिरवीत वा स्मृतींना
  असशील तूं दुधारी ?
निरखीत चांदणी ही
  क्षितिजास चुंबिणारी ?

...एकाच चांदणींत
  मिळतात चार डोळे,
या जाणिवेंत लाभे
  कांहीं मुकें, निराळें.

रत्नागिरी

## थोडी सुखी, थोडी कष्टी....

फारा दिवसांनीं आली
   मागारीण माहेराला;
स्टेशनांत भेटला नि
   ओळखीचा टांगेवाला.

ओळखीचा वाटला तो;
   कोण, कोठचा, ही भ्रांत !
हसला तो ओळखीनें
   आणि चढली ती आंत.

नाहीं वळविली त्यानें
   पुन्हा दृष्टि तिच्याकडे;
भरधांव सुटे घोडा,
   आणि चाबूक कडाडे

ओळखीचे आले वाडे,
   आली, आली, गेली शाळा
"अगबाई ! तोच हा का ?"
   तिला चंदू आठवला !

आठवलें सारें सारें,
   आठवले त्याचे डोळे;
आणि तिच्या काळजांत
   कांहीं थरारून गेलें.

फारा दिवसांनीं आली
   मागारीण माहेराला;

गल्लींतल्या घरापुढें
त्यानें टांगा थांबविला.

नाहीं वळविली त्यानें
पुन्हा तिच्याकडे दृष्टी;
माहेराला भेटली ती
थोडी सुखी, थोडी कष्टी.

रत्नागिरी

# विप्रलंभ

“येईन बघ मी चौपाटीवर
टिळकांच्या पुतळ्याच्या पाशीं.”
असें म्हणाली भांडीं घाशित
समोरच्या चाळींतिल काशी;

तेव्हांपासुन मनास त्याच्या
डिंवचित होती तिचीच वाचा;
गोलपिठ्याच्या रस्त्यास जणूं
दंग्यांतिल सोड्याच्या कांचा.

डिंवचित होती; झुरवीत होती;
मध्येंच होती सुखवित त्यांतुन;
पान लागलें रुचकर त्याला
आज अकोली तंबाखूविण !

गुजराथ्यांचीं तुपाळ ताटें
आज निघालीं चक्क घरोघर;
मिराबेनचें पातळ विरलें;
बड्या शेटचें फाटे धोतर !

आज तयाच्या अंगामध्यें
तसेंच होतें शिरलें वारें;
नित्याच्या कामाचें ओझें
आज जाहलें हलकें सारें.

अन् चंचीच्या चोरकप्यांतिल
पुन्हा पाहिला खजिना त्यानें;

मध्येंच हसला तो अपुल्याशीं,
  ‘सबंध रुपया’...सोळा आणे.

काळोखांतिल पदस्थलावर
  इतर गड्यांचीं प्रेतें झालीं;
नंतर उठुनी हळूच त्यांतुन
  सुसाट त्याची स्वारि निघाली.

चौपाटीवर पुतळ्यापाशीं
  उभा राहिला तो घटकाभर;
परंतु हर हर ! दिसे न काशी;
  दगलबाज ती पोर बिलंदर.

पान मसाल्याचें काशीस्तव
  खिशांत होतें बेचव, बेचव;
नकळत चघळत तेंच तयानें
  शिव्या घातल्या तिजला अभिनव

आणिक नंतर हवेंत उडवुन
  रुपयाला तो झेलित बसला;
विडी पेटवुन कडक कुड्याची
  आनंदानें खदखद हसला !

रत्नागिरी

# घेरी

तूंच दाविलिस मजला गंमत
   रसाळ ओल्या ओठकळीची;
तूंच लाविलिस मजला लज्जत
   नरम उराच्या गरम मिठीची;

तूंच तूंच हे भलते चाळे
   शिकवुन केलिंस वेडीं बोटें;
कशास म्हणसी उगाच आतां,
   'सगळें खोटें...खोटें खोटें.'

बैस जाउनी उंचावर तूं;
   लोळत मी या स्वस्त गटारीं;
सावध, सावध, पाहुं नको मज;
   नकळत तुजला येइल घेरी !

रत्नागिरी
२६.१०.४९

## आत्मिक अपघात

येतात येतात
सुखद क्षणांची
धूळ उधळीत
अंतर्मनाच्या
धूसर क्षितिजांतून
तुझ्या स्मृतींच्या
मोडक्या मोटारी;
येतात अजून
तुझ्या स्मृतींच्या
मोडक्या मोटारी
टाकीत मागें...
—सैराट माळरान,
—अवघड घाट,
—असंख्य डबकीं;
ज्या डबक्यांतून
सोनेरी ढग
अजूनहि फेकतात
छायांचीं जाळीं.

तुझ्या स्मृतींच्या
येतात मोटारी
विकारांच्या उतारावरून
विजेच्या वेगानें;
खडखडत...
धडधडत...
करतों शिकस्त

सरण्या बाजूला
अगदीं गटारांत !
आत्मरक्षणार्थ
दुबळा प्रयत्न !
पण व्यर्थ !
होतें होणारें;
आणि घडतो
रक्तसमाधीच्या
ऐन रंगांत
आत्मिक अपघात.

रत्नागिरी

# समज तुझा हा गौरव

जखम जुनी वाहतसे
   पाप असे त्यांतिल पू;
पापाची जाणिव ही
   यापासुन कोठ लपूं?

आत्म्याचा रोग महा
   भूताची भेट मला;
भूल तुझ्या स्पर्शांतिल
   आशा मम तूं अबला.

बाहूंनीं कवटाळुन
   देहाची सुरई तव
मी प्यालों अधिरपणें
   बुडण्यास्तव, बुडण्यास्तव.

समज तुझा हा गौरव;
   बुडतांना शांति मिळे.
आत्म्याच्या घुमटींतिल
   पापाची पाल पळे.

रत्नागिरी

## अशा प्रसंगीं

रोमांचित अवनीचा जेव्हां
आनंदें थरथरतो कणकण,
झगमगल्या तेजाळ विजांचे
वाजत असती जेव्हां कंकण,

सळसळल्या रक्तांतच तेव्हां
आत्मा असतो माझा वाहत;
अणूअणूंच्या स्पर्शांमधुनी
तुजला पाहत, तुजला पाहत.

अशा प्रसंगीं अपार्थिवाची
शरीर टाकी तोडुन वेसण
आणिक घेई धाव तुझ्यास्तव
तुझ्यांत घेण्या मिसळुन मीपण.

रत्नागिरी
४.४.५०

## मला वाटलें

पेशींची ही घागर फुंकित
  प्रीत तुझी बेसावध झाली;
अंगांत तिच्या आलें; आणिक
  त्रिकालगूढें मजला कळलीं.

आकाशाचें मधाळ पोळें
  गळलें पृथ्वीच्या ओठावर;
ताऱ्यांच्या मधमाशा बसल्या
  कल्पतरूच्या फुलाफुलांवर.

दुःखाचा भिरकावुन बुरखा
  खुदकन हसलें खट्याळ जीवन;
मला वाटलें, कवटाळावी
  अवघी दुनिया करांत घेऊन.

रत्नागिरी
१२.४.५०

९६५४८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७४१०६ दि. ७।८८
क्रमांक ९६५४८ नों. दि. ९।३।७९

# आंगठी

पेशींच्या होडींतून
सुखद संवेदनांचीं
सोनेरी वल्हीं
हालवीत, हालवीत
येते प्रीती
आत्म्याच्या भेटीला
—ॲन्टनीला भेटणाऱ्या
क्लिओपॅट्राप्रमाणें.

संस्कृतीच्या शापानें
पडत्ये आत्म्याला
स्वतःची विस्मृती;
विसरतो आपलेच
पुरातन संबंध
आश्रमाच्या अंधारांतले;
आणि सविस्मय
विचारतो प्रश्न :
‘कोण? कुठची?’
—शकुंतलेला विसरणाऱ्या
दुष्यंताप्रमाणें.

पण शेवटीं
पटतेच ओळख;
जेव्हां करत्ये
अगतिक प्रीती
सुखद संवेदनांच्या

प्रवाही आवेगांत
खुणेच्या आंगठीचें
आवश्यक प्रदर्शन !

कागल
२३·६·५०

## सखे, तुझें जाईचें जीवन

तुझ्या उराच्या घरट्यामध्यें
   झुळुक होउनी हळुच शिरावें;
तुला न देतां चाहुल, तुझिया
   निःश्वासांतुन निसटुन जावें !

तुझ्या उराच्या घरट्यामध्यें
   पुष्पपदांनीं अन् चवड्यावर
हळुच शिरावें थबकत थबकत
   आणिक जावें चुंबुनि अंतर !

तुझ्या उराच्या घरट्यामध्यें
   हळुच शिरावें शशिकिरणासम;
मधाळ सुखदुःखांना घेऊन
   स्वर्गसुखाचा सोडावा श्रम.

सखे, तुझें जाईचें जीवन;
   —परंतु उसनें आणुं कसें बळ ?
तुझ्या उराच्या घरट्यामध्यें
   मी शिरतों होउनियां वादळ.

कागल
१०·७·५०

# नूरजहाँ

मी तुजला वदलों तो
   शब्द एक अधिक-उणा;
—बोटांनीं पुसलिस तूं
   मम ओली अधरखुणा.

तूं चिडलिस डंखाविण;
   वदलिस तूं, 'दूर रहा';
आणिक मग दिसली मज
   तव नयनीं नूरजहाँ !

कागल
३०·१०·५०

# दैवावरी देण्या मात

जन्ममृत्यूचीं कुलुपें
  सखे, फोडूनियां सात
आज लाभला शेवटीं
  प्रकाशांतला एकांत.

ओठांमध्यें शिरे ओठ;
  किनाऱ्यांत शिरे लाट;
...क्षितिजाच्या भालावरी
  उजळली लाल वाट.

देण्याआधींच पोंचलें
  तुझ्या घरीं माझें देज;
...झुंजणाऱ्या कपाळाला
  दैव भरी लाल शेज.

एवढेंच मागतों मी
  दैवावरी देण्या मात;
तुझ्या ललाटींची रेषा
  उठो माझ्या ललाटांत.

कागल

## कांटे

तव गोऱ्या अंगावर
   विव्हळतसे पदर निळा;
कळतिल गे त्याला मम
   गूढगूढ गोड कळा.

कृष्णपक्ष रजनीचा
   तव मानेवर लोळे;
तो समजे कां भरती
   अंधारें मम डोळे.

त्रस्त तुझ्या कंचुकिला
   खिल्याचें यश टोचे;
ती जाणिल...कोण दुजें ?...
   कां जीवन मज बोंचे.

फक्त तुला नच कळतें
   मज असलें कां वाटे;
तूं गुलाब, तुज कैसे
   बोचतील तव कांटे ?

कागल
१०.९.५१

## तीर्थाटण

तीर्थाटण मी करित पोचलों
नकळत शेवट तव दारीं;
अन् तुझिया देहांत गवसलीं
सखये मज तीर्थें सारीं.

अधरावरतीं तव वृंदावन;
प्रयाग सापडलें नेत्रीं;
भालावरतीं नें मानससर;
मानेवरतीं गंगोत्री;

गया तुझ्या गालांत मिळाली;
रामेश्वर खांद्यावरतीं;
मिळे द्वारका कमरेपाशीं
अन् काशी अंवतींभंवतीं.

मोक्षाचीही नुरली इच्छा;
नको कृपा याहुन दुसरी;
तीर्थाटण मी करित पोचलों
नकळत शेवट तव दारीं.

बेळगांव
३.९.५२

# एक प्रश्नोत्तर

रस्त्याच्या दगडी छातीवर
वाट लाजरी भाळुन गेली;
आणिक घेउन वळण जरासें
लाल होउनी त्यास म्हणाली :

" कुठून आलां...सांगा ना पण...
कुठें चालली अपुली स्वारी ? "
रस्ता वदला, " तें नच ठाउक;
मागुन आलों, पुढें भरारी. "

वाट म्हणाली, " का प्रेमाला
प्रश्नांचें या पथ्य असे तर ! "
रस्ता वदला, " प्रेमामध्यें
प्रश्न संपती, उरतें उत्तर. "

...वाट मिळाली रस्त्याला मग;
लाली चढली त्या रस्त्यावर;
वटवृक्षानें म्हटलें मंगल;
तोही होता उभा तिठ्यावर !

बेळगांव
१२.१०.५२

# अग्नितुला

बहर तुझा ओसरला
अन् आला बहर मला;
हें असलें करणें ही
कालाची अजब कला.

उरलेलें जीवन तुज
सरल्याचें स्वप्न असे;
तुज जागृत करण्याचें
मजलाही धैर्य नसे.

स्वप्नांतुन उठवुन या
नेउं कुठें तुज दुबळे ?
...ज्वालांच्या शेजेवर
पोलादी प्रणय जळे...

ये वेडी होउन मग
यायचेंच जर तुजला;
...व्हायची इथून पुढें
प्रीतीची अग्नितुला.

बेळगांव
२९.१०.५२

# किती विलक्षण !

तुला भेटण्यासाठीं आलों;
परंतु वदलों दुसऱ्यासाठीं.
तुझ्या तापलेल्या भालावर
जरा उमटली आंबट आंठी.

मनांत होते शब्द दाटले;
जिभेंत नव्हती तितकी छाती;
मनांत होतें मणभर सोनें;
करांत होती मुठभर माती.

कसें तुला समजाऊं आतां;
कसा बोलवूं गेलेला क्षण;
त्या मुठभर मातीनें माझा
सूड घेतला किती विलक्षण !

बेळगांव
१५.११.५२

## डंख

फक्त एकदां तुझ्यांत यावें;
   तुझा करावा एकच घोट;
तुझ्या गळयाला दंश करावा
   तुझा गिळावा बधीर ओठ.

फक्त एकदां—आणि करावी
   शतजन्मांतिल एकच चोरी;
कुबेर होउन तुझ्यांत यावें;
   होउन जावें पुरें भिकारी.

देळगांव
३०.११.५२

# फ्राइडला कळलेलें संक्रमण

हल्लीं हल्लीं फुलूं लागल्या
शेजारिल सान्यांच्या पोरी;
उन्निस वर्षांच्या अभयेला
येउं लागली मध्येंच घेरी;

सतरा वर्षांची सुलभाही
हुळहुळणारें नेसे पातळ;
मध्येंच होई खिन्न जराशी;
मध्येंच अन् ओठांची चळवळ;

पंधरा वर्षांची प्रतिमा पण
बुझते पाहुन पहिला जंपर;
तिला न कळतें काय हवें तें
तरी पाहते ती खालींवर;

हल्लीं हल्लीं फुलूं लागल्या
शेजारिल सान्यांच्या पोरी;
बाप लागला होऊं प्रेमळ;
आई, कडवट आणि करारी!

बेळगांव
१.१२.५२

## समज असें कीं हें वरवरचें

सहवासाचे घोट चोरटे
अनुचितसे लहरी बेत,
फुलदाणींतिल जास्वंदीच्या
भडक फुलांचा संकेत;
दारावरच्या तीनच टिचक्या;
वेळकाढु लोचट घाई;
समज असें कीं हें वरवरचें
अन् दुसरें नव्हतें कांहीं.

तें परकेंपण काळिजखाऊ;
'तुम्ही तुम्ही'चा तो गोषा;
मंतरलेलें खरें मुकेंपण;
अन् खोटी अवघड भाषा;
डबडबलेल्या डोळ्यांमधला
गढूळसा वेडा भाव;
समज असें हें वरवरचें अन्
देउं नको भलतें नांव.

कोण घसरलें प्रथम, तयाची
कशास ती चर्चा फोल ?
स्वर्गंगेंतच पडलों आपण
जाउनियां जीविततोल;
असल्या बुडत्यांना कांठावर
येण्याची कसली घाई ?
समज आपलें रक्तपिसें हें
अन् तसलें नव्हतें कांहीं.

बेळगांव
२.६.५३

## माझें घड्याळ

घड्याळ माझें नवें असे;
सुंदर दिसतें पहा कसें !
दादाचें तर जुनें मुळीं;
झुरळांची वाटे खोली !
घड्याळ माझें लखलखतें;
सांग कोणचें आवडतें ?

‘ उगाच वटवट बोलुं नये;
कटकट कोणा करूं नये ’
—तूंच नाहिं का म्हणत असें ?
किटकिट त्याची सदा असे.
दिवसां किटकिट,
रात्रीं किटकिट,
घड्याळ माझें गुणी मुळीं
कटकट कांधिं ना करी खुळी !

गडबड करितां मार मिळे,
हेंहि न त्याला कसें कळे ?
रात्रीं निजण्याच्या वेळीं
दादा त्याचा कान पिळी;
कुरकुरतें, परि ना खळतें,
रागानें चिडुनी जातें;
झोंप लागते दादाला,
तें नच खपतें पण त्याला;
पहाट होतां गुरगुरतें,
दादाला जागें करतें.

        दादा उठतो;
        चिमटा घेतो;
तेव्हां मग तें गप्प बसे;
घड्याळ माझें कधिं न असें !

रात्रीं नशिबीं कोनाडें;
दिवसा करितें पुढेंपुढें.
उगाच बसतें ऐटींत
हालवीत अपुले हात;
लहानमोठे हात तसे
पाहुन येई मला हसें.
लाज तयाला ना त्याची;
खोड कोठची जायाची ?
हात असे फिरवुन आधीं
मोडुन घेनें कधींकधीं !
        वैद्य आणुनी,
        हात जोडुनी,
दादा देतो पुन्हां जरी,
फिरवित बसतें हात तरी !
घड्याळ माझें परी पहा;
चाळा त्याला मुळीं न हा.

घड्याळ दादाचें, आई,
सर्वांना करितें घाई.
खेळ रंगला असे जरी
मधेंच दादा पुरा करी.
गोष्ट न राजाची सरली;
बाबा म्हणती, ' छे, झाली. '

घड्याळ असलें
कुणास सुचलें ?
घडयाळ माझें गुणी परी,
किती वाजले पहा तरी !
सकाळचे अवघे सात;
म्हणती खेळा बागेंत.

करवीर
२७.१२.४०

# जादूगार

*आई :* मोठा झाल्यानंतर रे
होणार अरु कोण बरें ?
*अरु :* मी तर होइन जादूगार;
गंमतजंमत मी करणार :
घेइन रंगित पेटारा;
जादूचा मालच न्यारा !
मुंगुस, बेडुक, नाग असे
वळवळ करितिल आंत कसे !
जादूचे मंत्रच भारी;
जादूची डमरू-टिपरी.
वाजवीन मी मग पुंगी,
सापांना आणिन गुंगी.
मुंगुस घालुन पोत्यांत,
फुरशानें मारिन गांठ !
घणसाचा चाबूक बडा
वाजवीन मी तडातडा.
डमडम डमरू
टिपरी टरुरू
मुलींच तुम्ही भिऊं नका;
मंत्रतंत्र हे उगाच कां ?

म्हणाल, जादूगार खरा !
असा पाहिला ना दुसरा !
भस्म मंत्रुनी उंच उडे;
पैशाचा पाऊस पडे.
शेजारिल पोरें सारीं

धांवत येतिल सामोरीं;
तीं करतिल गोळा पैसे
आणिक भरतिल सर्व खिसे.
डमडम डमरू
टिपरी टरुरू
चोर घरीं मग पळतिल ते,
रडतिल पाहुन खिसे रिते !

कुरूप नी काळी ताई,
आणिक शिकलेली नाहीं;
पसंत कोणा ना पडते;
खोली लावुन मग रडते.
चिंता परि ना असे मला;
मी तर गे जादूवाला.
डमडम डमरू
टिपरी टरुरू
राजाचा मुलगा दारीं
ताईचा मग शोध करी.
म्हणेन मी, " चल जा, नाहीं
मिळणारच अमुची ताई. "
करील मग तो गयावया;
आणिक येइल मला दया.
राजपुत्र हा थोर जरी,
तो नवरा, ताई नवरी.

खरेंच, आई, तुला नवीं
धडकीं लुगडीं दोन हवीं.
कमळीचा परकर सगळा
अगदीं बघ फाटुन गेला;

भाऊला बघ लंगोटी
नकोच का याहुन मोठी ?
बाबांना पंचाबद्लीं
हवीं धोतरें लांब भलीं;
डमडम डमरू
टिपरी टरुरू
पडला पुढतीं ढीग पुरा;
काय कमी जादूगारा ?

पाहुनि अमुचा थाट असा
म्हणतिल सारीं : "अहो बसा."
"वेळ नसे आम्हास"—परी
म्हणेन मी गोप्यास तरी !
शेजारिल बकुळाकाकी
बोलतील तुजशीं, "या कीं !"
तूंही त्यांना स्पष्ट असें
सांग, "अम्हांला वेळ नसे."
आग्रह झाला जर भलता,
विचार येइल मग करतां !
उरेल ना कांहींच उणें
माझ्या जादूच्याच गुणें ?
डमडम डमरू
टिपरी टरुरू
बरण्या आणिक डबे भले
पहा कसे भरुनी गेले !
बरण्यामधुनी तूप असे.
डब्यांत साखर फक्त दिसे.
भाऊ मग ना फीसाठीं

राहिल वर्गाच्या पाठीं.
भाड्याकरितां मग भय्या
देइल ना दारीं ठिय्या!
बाबांना पुन्हां धरुनी
पोलिस ना नेतील कुणी.

आई : नको; नको बोलूं बाळ,
थांब थांब रे लडिवाळ...

अरू : नको कोण तूं म्हणणार!
होइन मी जादूगार.

करवीर
२८.१२.४०

# बेडकांचें गाणें

डरांव् डुरूक् डरांव् डुरूक्, डरांव् डरांव् डरांव्;
आम्ही मोठे राव; डराव्, डरांव्, डरांव्!

सागर म्हणती उगाच मोठा,
भव्य किती डबक्यांतिल लाटा!
सागर नुसतें नांव; डरांव्, डरांव्, डरांव्!

गंगाजळ ना याहुन निर्मळ;
या डबक्यांहुन सर्व अमंगळ;
बेडुक तितुके साव; डरांव्, डरांव्, डरांव्!

खोल असे ना याहुन कांहीं;
अफाट दुसरें जगांत नाहीं;
हाच सुखाचा गांव; डरांव्, डरांव्, डरांव्!

चिखल सभोंतीं अमुच्या सुंदर;
शेवाळ कसें दिसे मनोहर;
स्वर्ग न दुसरा राव; डरांव्, डरांव्, डरांव्!

मंत्र आमुचा 'डरांव्' आदी,
'अनंत' आणिक असे 'अनादी',
अर्थ कसा तो लाव; 'डरांव्, डरांव्, डरांव्!'

करवीर
१०.१.४१

# आमचा राजा

*बाळ* : इंग्लंड दूर कोठें तेथ म्हणे रहातो!
देशांत काय चाले तें तेथुनी पहातो!
ना भेटतो अम्हांला, आम्ही न भेटुं त्याला;
होता न का शिवाजी येथेंच राहण्याला?
आई, दिसे मला हा राजा कुणी निराळा.
*आई* : जे जे गुलाम, त्यांना राजा असाच बाळा!
*बाळ* : म्हणतात हा इसाई; हिंदी मुळींच नाहीं;
ना पूजितो घरीं वा ना देवळांत जाई.
म्हणतात हा न कोणी श्रीरामकृष्ण मानी;
होता न का शिवाजी पूजीत श्रीभवानी?
आई, गमे मला हा राजा कुणी निराळा.
*आई* : जे जे गुलाम, त्यांना राजा असाच बाळा!
*बाळ* : राजा इथें मराठा, राणी इथें मराठी.
आणीक देश माझा वाटे तयांच साठीं.
त्यांच्याच वंशजांना हा देश कां न मानी?
हा इंग्रजी तरी त्या सारे कसे इमानी?
वाटे मला खरें हा राजा कुणी निराळा.
*आई* : जे जे गुलाम, त्यांना राजा असाच बाळा!
*बाळ* : होता न का शिवाजी याहून फार काळा?
आणीक वेष त्याचा होता किती निराळा!
हा आमुचा कसा गे राजा असा निराळा?
*आई* : जे जे गुलाम, त्यांना राजा असाच बाळा!

करवीर
११.२.४१

# पंतोजी

खरेंच भाऊ, पंतोजी
पेन्शनींत गेले आजी.

मारकुटे होते फार!
मार न आतां मिळणार!
जाडेंभरडें आखुडसें
धोतर शोभे त्यांस कसें.
डोइस हिरवें पागोटें
अगडबंब, मळकें, मोठें!
शेंडी न परी आंत दडे;
वाऱ्यावरतीं सदा उडे.
कपाळास साऱ्या आठ्या;
पाटीवरच्या रेघोट्या.
गंधाचा त्यावर पट्टा;
त्यांस न रुचते पण थट्टा.
जुनाटसा जोडा खंदी;
अंगरखा बाराबंदी;
पोटापुढतीं खिसा असे,
चंची काळी त्यांत बसे.
तोंडानें चघळीत विडा
धडा शिकविती तडातडा.
लाल ओंठ, लालच डोळे
चुका शोधण्या टपलेले.
आणिक दंगा जरा करा,
मिळेल खाऊ पुरा पुरा.
छडीच छम् छम्

घुमेल घम् घम्
हातावर हा खाउ कधीं
तोंडांत मिळे अधींमधीं !

लहानमोठा भेद नसे
गरीब अथवा धनिक तसे !
मुलांसही खुर्ची देती !
धरा आंगठी वा म्हणती !
रजा कधिंच ना ते घेती;
रोजच वेळेवर येती.
डोळ्यांवर चष्माहि असे,
तरी न कांहीं पुरें दिसे.
हात लावुनी डोळ्यांना
बघती चष्मा आहे ना !
पुस्तक हातीं कधीं नसे;
पुस्तक सारें पाठ असे.
पाठ तसें करवुन घेती;
चुकतां अंगावर येती.
छडीच छम् छम्
घुमेल घम् घम्
मुलें कांपती पाहुन तें;
गोपू तर चड्डींत मुते !

आज परी म्हणतात मुलें
पंतोजी झालेत खुळे !
आज तयांना ज्या वेळीं
पानसुपारी बघ झाली,
त्या वेळीं कोणी त्यांना
म्हटलें, "भाषण करतां ना ?"

खुर्चींतुन ते मग उठले;
"बाळांनो !" इतकें वदले.
शब्द न फुटले यापुढतीं;
सर्वांच्या देखत रडती;
आणिक घेउन आम्हांसी
धरूं लागले पोटाशीं;
पंतोजी झालेत खुळे,
हें पाहुन मी दूर पळें;
        छडी न छम् छम्
        घुमे न घम् घम्
खुळे मारके पंतोजी
पेन्शनींत गेले आजी !

करवीर
२२.२.४१

## बागुलबोवा

रात्र पसरते जेव्हां भंवतीं,
समोरच्या त्या अंब्यावरतीं
येउन बसतो बागुलबोवा,
कुणा न कळतो त्याचा कावा!
मी तर या डोळ्यांनीं पाहें
भीषण त्याचें रूप असें हें :

पिकलेली डोक्यावर शेंडी;
—तागाची तकतकती पेंढी!
गरगर फिरती हिरवे डोळे;
—गारेचे चकमकते गोळे!
आणिक खालीं नाक फदाडें;
—पडक्या भिंतींतिल कोनाडें!
जीभ फिरे दांतांतुन पाही;
सुसर जशी खडकांतुन येई.
दांत वाटती दगडच काळे;
कान सुपाच्याहुन मोठाले.

बागुलबोवा पण म्हातारा;
उमर तयाची काय विचारा :
सात कमी वय सात हजारा!
कांहिं न त्याला दुसरें पचतें;
पोर शेंबडें रडवें रुचतें!
घेउन जातो असलीं बाळें
आणिक भरतो अपुले ढोले!
पसरुनि पानें नंतर त्यावर

आपण बसतो त्या पानांवर;
आणिक जेव्हां पिकते आडी,
एक हळू मग खाण्या काढी!

झाड पहा तें पुढचें हाले;
बागुलबोवा तिकडे गेले!

करवीर
२८ २.४१

## नारद (शेंडेपांखरूं)

आला-गेला गार हिंवाळा,
आला-गेला गरम उन्हाळा,
नारद कां न दिसे त्या वेळीं ?
नसतो, कीं लपतो पाताळीं ?

आणिक पाउस पडल्यानंतर
अळें उगवलें अमुचें सुंदर.
वेल वाढले, वरतीं आले;
मांडव झाला, त्यावर चढले.
जों नच पडल्या इवल्या वाती,
नारद बसला खुंटावरतीं !

पंख तयाचे कसरे, काळे;
तसेंच काळें अंतर सगळें;
खुनशी मुद्रा, खुनशी डोळे;
नजर चोरटी, कपटी चाळे;
डोक्यावर शेंडी तुरतुरती,
बसला येउन खुंटावरतीं.

खोड तयाला वाइट मोठी,
मोठी आणिक अगदीं खोटी,
तुरे कोवळे तोडुन जावें;
कांहिं न कोठें उगवूं द्यावें;
असोत त्या फुलवाती कवळ्या,
तोडुन हा टाकिल त्या सगळ्या.
चोंच जरा जर मोठी असती,
पोर न उरलें असतें जगतीं !

आपण बसतो त्या पानांवर;
आणिक जेव्हां पिकते आडी,
एक हळू मग खाण्या काढी!

झाड पहा तें पुढचें हाले;
वागुलबोवा तिकडे गेले!

करवीर
२८ २.४१

## नारद (शेंडेपांखरूं)

आला-गेला गार हिंवाळा,
आला-गेला गरम उन्हाळा,
नारद कां न दिसे त्या वेळीं ?
नसतो, कीं लपतो पाताळीं ?

आणिक पाउस पडल्यानंतर
अळें उगवलें असुचें सुंदर.
वेल वाढले, वरतीं आले;
मांडव झाला, त्यावर चढले.
जों नच पडल्या इवल्या वाती,
नारद बसला खुंटावरतीं !

पंख तयाचे कसरे, काळे;
तसेंच काळें अंतर सगळें;
खुनशी मुद्रा, खुनशी डोळे;
नजर चोरटी, कपटी चाळे;
डोक्यावर शेंडी तुरतुरती,
बसला येउन खुंटावरतीं.

खोड तयाला वाइट मोठी,
मोठी आणिक अगदीं खोटी,
तुरे कोवळे तोडुन जावें;
कांहिं न कोठें उगवूं द्यावें;
असोत त्या फुलवाती कवळ्या,
तोडुन हा टाकिल त्या सगळ्या.
चोंच जरा जर मोठी असती,
पोर न उरलें असतें जगतीं !

पक्षी देतिल हाकुन याला;
म्हणतिल, " तूं तर शेंडीवाला ! "
" शेंडी असो, पण छे ! " म्हणतिल नर,
" माणुस तूं नच, पक्षि खरोखर !"
शेवट फिरतो एकलकोंडा;
कुणा न रुचतो, मिळतो धोंडा.
वाटे मजही घ्यावा फत्तर
नेम धरावा त्या चोंचीवर !

छे, पण गेला उडुनी नारद !
चुकलें सारें, हुकली पारध !

करवीर
५.३.४१

# पतंग

अरू : पतंग मजला आवडतो;
उंच किती वरतीं जातो !
दोरा धरुनी उंच चढे;
क्षणांत मेघाआड दडे.
कबूतरांच्या बरोबरी
दडाकुकीचा खेळ करी.
घेऊन गिरकी,
मारुन फिरकी,
वाऱ्याशीं खेळे कुस्ती,
हवी तशी दंगामस्ती !

सभोंवतीं त्याच्या फेरी
घालतात कां त्या घारी ?
खेळगडी तेथें नाना
चिमण्या नी राघू, मैना.
खूप खेळ ते खेळावे;
वाऱ्यावरतीं पोहावें !
मुलांस टुकटुक;
फुलांस टुकटुक;
जगास जें ना कधीं मिळे,
पाणी प्यावें ढगांतलें,

दिसेल का तेथुन त्याला
मामाच्या घरचा माळा ?
दिसेल का तेथून पुढें
डोंगरमाथ्यापलीकडे ?

आणिक तेथुन तूं आई,
दिसशिल कीं मजला नाहीं ?
पतंग व्हावें;
उंच उडावें;
वाटे आकाशीं जावें !
*आई* : असें कधीं ना बोलावें !

करवीर

# उसनें

सुटी जाहली नी परतलों, आलों गांवाला
आणिक ना उरला पार गे! तव आनंदाला.
नको, नको, म्हणतां तूप त्वां आणुनियां उसनें
शिरा करुनि दिधला मला ना रुचलें हें करणें.
आणिक मी नाहीं कांहिंही विचार मनिं केला;
तडातडा सगळें बोललों लागुनियां तुजला.
विनवुन तूं म्हटलें, "पुन्हां मी आणणार नाहीं."
मी परतुन वदलों, "तरी मी घेणार न कांहीं."
नंतर कष्टानें तुवां मग नेली आंत बशी;
आणिक मज दिसलें पाणि तव आलें नयनाशीं.

तूप आज उसनें नसे पण उसनें प्रेम वसे!
घांस कसा गिळणें? गळ्यांतुन खालीं न जात असे.
तें उसनें गेलें; दिवस ते पडले गे मागें;
सौख्य पडे पुढतीं; तुझ्याविण गोड न तें लागे!

करवीर
५.३.४१

## शेवटचा लाडू

सुटी संपली नी चाललों गांवाहुन दूर;
आणिक तव नयनीं लोटला अश्रूंचा पूर.
ताप जरी होता तरी पण जागुनियां रात्रीं
मी निजतां करिशी तयारी मजसाठीं सारी;
आणिक हे लाडू तुला मी 'नको, नको' म्हणतां,
नकळत मज भरिशी डब्यांतुन तो भरतां भरतां.

तेच तुझे लाडू सुखानें मी पुरवुन खातां,
आज उरे मागें तयांतिल आवडता सरता.
वाटतसे वाई कशाला मी इतकी केली?
नाहीं तर असते अधिकसे उरले या वेळीं.
खाऊं नये वाटे तरी पण शिरतो तोंडांत,
आणिक मज भासे तुझा हा भरवितसे हात.
तूं असशी जवळीं दूर ना दूर कोंकणांत;
तूं भरवित असशी तुझ्या मी बसलों ताटांत.

छे, चुकलें, गेलें; संपला शिल्लक जो होता.
छे, चुकलें, आतां भास ना प्रेमळ तो पुढता.
उजाडेल उद्यां आणखी माधुकरी आळीः
उजाडेल उद्यां आणखी वारावर पाळी.
उजाडेल उद्यां आणखी भूक मला खाई;
उजाडेल उद्यां आणखी लाडू मज नाहीं.
मिळेल जो मजला उद्यां तो मी गिळणें घांस
मिळेल ना कोठें असा हा, आई, तव भास!

# चिमुरडी

पोर चिमुरडी
चुफते नाड्या;
करिते खोड्या
गोड्या, गोड्या.

ओठ इटुकले,
गुब्रे गाल,
नाकं-नक्टी
लाले लाल.

पोरच का ही ?
कीं स्वर्गातिल
परीच आली
बघण्या भूतल ?

म्हणुन पाहतों
पुन्हां पुन्हां तर
पाय टेकते
का ही भूवर !

रत्नागिरी
८.४.५०

## गणपतिबाप्पा

गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
पुढच्या वर्षी येशिल का?
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
एकविस मोदक खाशिल का?
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
उंदरावरतीं बसशिल का?
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
सोंडेखालीं हसशिल का?
गणपतिबाप्पा मोरया,
पुढच्या वर्षी लौकर या;
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
धोंद वाढलें किती पहा;
गणपतिबाप्पा, गणपतिबाप्पा,
जोरबैठका काढ दहा !

बेळगांव
३.९.५२

# येरे येरे पावसा

येरे येरे पावसा,
तुला देइन पैसा;
पैशाचा घे खाऊ;
दूर नको जाऊं.

येरे येरे पावसा,
देइन तुला आणा;
आणा नाहीं थोडा,
आण निळा घोडा.

येरे येरे पावसा,
फेक तुझा फांसा;
नको सांगूं दान !
देइन रुपया छान.

येरे येरे पावसा,
डोंगर तुझा मावसा.
टाक सगळें नाणें;
फुकट नाहीं गाणें !

बेळगांव
१९५२

## रिती परडी

जन्मोजन्मीं खपुनि, मोहरा
जमवुनि भरला हंडा सारा;
आणि आणिला तुझिया दारा;
तूंच मृत्तिका त्याची केली;
जादु अशी अनुचित, अनुदारा!

जन्मा आलों चव्हाट्यावरी;
वाटा जाती दिशांस चारी;
तशांत वदती सर्व पुजारी:
"फक्त असे मम वाट बरोबर."
बोल कसें मी यावें मंदिरिं?

वणवण करुनी मी अनवाणी
प्रभु रे! फिरलों रानोरानीं;
अधिर मनानें सुमनें वेंचुनि
भरली माझी परडी सत्वर,
आणि धांवलों तुझिया सदनीं.

भेटुं लागले पुढें पुजारी
एक बोलला, "वर्ज्य कणेरी."
आणिक दुसरा, "ही शंकोदरि."
फुलें अशीं फेंकुनियां नंतर,
रितीच परडी उरली स्वकरीं!

## अज्ञानाचें ज्ञान

दोष कसा त्यां अज्ञ मानवां
सत्य मार्ग नच त्यां जर ठावा ?
सर्वज्ञासच ज्ञात असावा !
        डोळे बांधुन ' पहा ' म्हणावें !
धन्य तुझा हा अगम्य कावा.

चमत्कृतीचा भव्य पसारा
पसरुनि माझ्याभवतीं सारा
उगाच कां रे छळसि मनाला ?
        सार दूर हें पटल मुरारी;
फोड फोड वा नयन दयाळा.

अज्ञानांतच ठेऊनि मजला
धडपड बघणें रुचतें तुजला;
खुशाल देवा खुशाल खेळा !
        निदान कां मग दिलेंस हें तरि
अज्ञानाचें ज्ञान मनाला ?

## प्रदक्षिणा

पहाटेच्या घंटेनें जागृत
होउन आलों येथें धावत
थंडी, वारा सारा साहत.
        पडेल का हृत्कुंभांत तुझें
गोड गोड प्रीतीचें अमृत ?

पहाट गेली; सकाळ गेली;

सांज जाहली; किरणें कललीं;
वाट पाहुनी आशा थकली;
        हृत्कुंभांत न प्रेमामृत तव;
मम अश्रूंचीं फुलेंच सगळीं.

तुझिया दारीं झडते नौबत
सनईचें अन् सुरेल संगित;
गोंधळ किंवा चाले आरत.
        कसें तुवां ऐकावें त्यांतुन
मुक्या मनाचें माझें हृद्गत.

उगाच कां तुज नांवें ठेवूं ?
उगाच, आई, कां रागावूं ?
उगाच वटवट करितों वेडी,
        आंत जाणतों हें पण पुरतें
मीच घातली मजला बेडी.

प्रदक्षिणा घालावी तुजला,
म्हणुनी फिरतों; प्राणहि थकला;
मीपण माझें करितें गणती.
        प्रदक्षिणा नच तुजला होते;
मीच भटकतों माझ्याभंवतीं.

## शाळा

कुणी म्हणो, जग ' नश्वर ', ' माया ';
तुझीच वाटे मज ती छाया
थकलेल्या पांथास बसाया.

तिथें न कां रे इतरां थारा?
धनिक घोरती ताणुन पायां!

अशा जगाच्या शाळेमाजीं
स्वानुभवाचा नवपंतोजी
व्यवहारांतिल शिकवी 'जी–जी';
पुरे जाहली ही मज शाळा!
घरीं यावया मी तर राजी.

## अधिरा रसिक

अनंत जीवनचित्र चितारुन
तुवांच केलें मजला अर्पण;
एकच तुकडा त्याचा पाहुन
—अधिर मनाचा रसिक खरा मी!—
तुझ्या कलेला देतों दूषण.

उगाच का ही दिलीस दृष्टी?
तुझ्या कृपेची होइल वृष्टी;
फुलेल मम स्वप्नांची सृष्टी;
स्मशानही होइल नंदनवन;
मी फुलमाळी उगाच कष्टी.

धीर मला दे; साहिन वारे;
धीर मला दे; पाहिन सारें;
धीर मला दे, शोधिन मी रे
—जिवंत आशा मनांत तेवे—
तुझ्या कलेंतच तुला मुरारे.

असेंच वाहव पिसाट वादळ;
अशीच होडी आपट, आदळ;
दाखव रे मजला सागरतळ;
        असेल जर त्यानंतर मिळणें
तुझ्या प्रीतिचें मौक्तिक उज्ज्वल !

हिंडव प्रभु मज रानोमाळीं;
हिंडव मजला सांजसकाळीं;
हिंडव कितिही कांहिं न कुरकुर;
        विनती एकच, अस्ताआधीं
भेटव रे मजला माझें घर.

## बुद्धि

स्वानुभवाची जमिन कसाची
बीज रुजे श्रद्धेचें त्यावर;
आणिक वाढे वृक्ष तयांतुन
फळें लटकतीं ज्ञानाचीं वर;
हळूच तीं वेचुनियां सारीं,
नेउनियां विकण्या बाजारीं,
कोण पहा ही धावे नटवी ?
        बुद्धी म्हणती लोक हिला, पण
हीच फसविते मजला सटवी !

चीज हिच्या जी जवळी नाहीं
"जगांत" म्हणते, "नसे कधींही" !
माल दाविते अनंत रंगित;
        आणिक मी शब्दांनीं मोहुन
तोच खरेदी करितों गुंगीत.

## कोडें

अद्वैताची शिडी उभारुन,
जे नर आले तुजला पाहुन,
त्यांनीहि मी पुसलें जाउन;
आहे का 'आई' मज कोणी ?
ते वदती मजला लवलाही :
तुझ्यांत घे तव पाहुन 'आई'!

मला न कळलीं असलीं कोडीं;
त्यांत न वाटे मजला गोडी;
गांठ अशी मम बुद्धि न सोडी;
एक एवढा सुटतो धागा;
कोण तरी मज येथें धाडी.

## दूध

वृथाच गमती मजला तारे;
वृथाच गमतो सूर्य तसा रे;
कशास करिशी श्रम हे वेडे;
माझ्या या कवटींतच जोंवर
अंधार पडे! अंधार पडे!

दिलीस मजला जुनाट खोली
जड जगताच्या भिंतीवाली;
दिसतें जितकें आंत, न सारें;
ब्रह्मज्ञानाची नच खिडकी;
जनन-मरण हीं दोनच दारें.

विश्वाचें मग देउन कोडें
कशास करिशी मजला वेडें ?
शोध अरे, जा ज्ञानी जाडे;
        पोर असें मी, थोर न कोणी,
दूध मला दे ! दूधच थोडें !

सृष्टीच्या ह्या पाळण्यांत हें
बाळ कधींचें रडतें आहे;
झोके देतच आई राहे;
        उगी कसें राहील अशानें ?
पाज, पाज गे, भुकें न का हें ?

## दगड

तसेंच गाणें जशी बिदागी;
भावदीपिका घेऊन साधी,
दगडांतुन मी तुजला शोधी;
        राग तुला कां आतां यावा ?
तूंच दगड मज केलें आधीं !

दगड असे हा अशाचसाठीं
इथेंच पडती पहिल्या गांठी;
ठेंच लागुनी पडलों मी जरि,
        —दया असूं दे ही माझ्यावर—
नमस्कार तो जमा करी हरि !

## मूर्ति

सुंदर तूं जर—उषा निरखुनी,
प्रेमळ तूं तर—प्रिया चुंबुनी,
पवित्र तर—त्या ध्येया वंदुनि,
        विश्वरुपाच्या छटा पकडण्या
प्रयत्न करितों जन्मोजन्मीं.

दगड पाहुनी संगमरवरी,
आलेख्य तसें सुंदर भारी
ताज पाहिला कधीं न कोणी;
        मूर्तीची मम भूक शमेना;
मूर्तीसाठीं झुरत असें मी.

## लपंडाव

देहाची या करुनि पायरी
आत्मा दारीं चढे कसा तरि;
दार लाविलें तुवांच आंतुन;
        उघड दार तें, नाहीं तर मी
घेइन तें बाहेरुन लावुन !

श्रमलों, थकलों तुजला धुंडुन;
लपंडाव हा बुध्द्या मांडुन
तूंच आपणां धरिशी लपवुन;
        अतां जाणलें हें पण पुरतें;
तूंच काढ ये मजला हुडकुन !

मी नच कढतों माझ्यासाठीं;
तुझीच सेना व्हावी मोठी;
म्हणुनि धावतों तुझिया पाठीं;
उगाच कां मग उसना ताठा ?
अपुल्या जर जन्माच्या गांठी !

पळापळीचा खेळ न का हा !
देवघरांत न तूं सापडशी;
आणिक येतां शोधित देउळ,
मंदिर अपुलें सोडुन जाशी.
कोण अतां पण हरतो पाहूं !
भव्य असें बांधिन मी मंदिर
बाहेर न तूं शकशीं राहूं !

विश्वच माझें झालें मंदिर;
जिवाजिवांतुन प्रगटे ईश्वर;
ओळखिलें रे तव रूपांतर;
जा, जा, आणिक लप कोठेंही;
खुशाल अपुली माया पांघर !

तुवांच लपुनी मायेमागें,
जिवाजिवांचे जुळवुन धागे,
विणिलें विश्वाचें अंबर नी
रंगविलें मग तें अनुरागें.

## पहिला भास

शहर सभोंतीं गजबजलेलें,
मानवकृतिंनीं सारें भरलें;

अशा कृतींचें मी अवलोकन
केलें; दिसला मानव मजला;
तुझें न झालें अंधुक दर्शन.

कृत्रिमतेला जिथें न थारा,
जीव जिथें मग धांवत गेला.
हिरवीं रानें, निर्झर सुस्वर,
निर्मल सरिता, सागर काळा;
साधेंभोळें खेडुत जीवन,
साध्याभोळ्या अल्लड बाला;
भव्य, दिव्य या तुझ्या कृतींतच
भास तुझा पहिला मज झाला.

## मंदिर

हाडांच्या दगडांच्या भिंती,
घे मांसाचे मातीचे थर;
रक्ताची घे रंगसंगती;
कवटीचा घे घुमट तयावर;
मानसघंटा घे घणघणती;
सिंहासन घे प्रेमळ अंतर;
एक, दोन, वा अनंत कोटी?
जितुके नर, तितुकें तव मंदिर.

तिथेंच मी बांधीन पुजा तव;
तिथेंच मी वाहीन फुलें नव;
दोन पाउलें मी येत पुढें;
ये, ये, देवा, दयासागरा,
दोन पाउलें तूं ये इकडे!

## माझें फूल

फूल न माझें फुललें पुरतें,
तोंच वाहतों हें का चुकतें?
चालेल न का तुझ्या पुजेला;
        नसेल का कांहींच मुळीं ती
किंमत माझ्या आतुरतेला?

गुलाब, तुळशी, बेल जगींचे
तव किरिटावर हसतिल साचे;
ठेव मला तव पदकमलांवर;
        निदान विनती इतुकी शेवट :
टाक तुझ्या चरणांना त्यांवर.

## हृद्‌गंगा

तुझ्या दयेचा माल खपावा
करितां नर दुःखांत असावा!
काय तरी हा न्याय म्हणावा!
        सदय जरी तूं अदय तयांतच;
पुरा तुझा मी जाणुन कावा!

देहलतेवर हृदयाचें हें
कमळ कसें बघ उमलत आहे.
भृंग होउनी ये लवलाहे.
        मध न इथें! हें आमिष दावुन
बंदिवान मी करीन! पाहें!

कुशीशिवाय न करीन ‘ गाई ’;
मार मार तूं मार कितीही;
हट्ट असा मी धरीन तरिही;
        त्या मारानें स्फुंदत बसतां
घट्ट उराशीं धरशिल तूंही.

प्रेमाचे दे दंवबिंदू नव;
तेजाचे दे किरण मला तव;
फूल फुलव हें तुझ्या पुजेला;
        प्रेमस्वरूपा, प्रकाशरूपा,
वीट मला स्वत्वाचा आला.

हृद्‌गंगा धावत खळखळ ही;
फेन विनोदाचा वर येई;
रागाच्या लहरीही कांहीं;
        कशास सांगूं गुपित तुला पण ?
आंत प्रीतिचा प्रवाह राही !

## आराधन

नदींत माझ्या डोह विषारी
कुणा न पाणी देउन तारी.
स्वार्थाचा कालिया भयंकर.
        ये, ये, गोकुळच्या गोपाळा,
नाच तयाच्या मस्त शिरावर.

नदी जवळ ना; दूरच मंदिर;
घागर फुटकी असे शिरावर;

वार्टेतच होणार रिती; तर
पाय भराभर पडतिल माझे;
कमी न होवो तिळही अंतर.

जिवाशिवाचें नकोच मीलन.
दोन असूं या असेच आपण.
नको नको तें जळो देवपण.
गोड द्वैत हें संपुन जातां
मिळेल का देवा तव दर्शन!

असेंच चालो हें आराधन;
कधीं न होवो प्रसादसाधन;
पंख करूं दे फडफड भारी;
—निदान हें देशील तरी तूं?—
कधीं न लाभो नभीं भरारी.

तुझ्या दयेची पाहुन घागर
उत्सुकतेनें झालों तत्पर.
घागर होवो वरतीं उपडी;
तरी न लाभो जलबिंदू मज;
चोंच राहुं दे अशीच उघडी.

## नरयज्ञ

आकाशाचा निळा पाळणा;
माणिकमोत्यांचें त्या झुंबर;
धूमकेतुचें नवें खेळणें
लोंबत राहे उलटें त्यावर;

मेघांच्या पंख्यांनीं शीतल
वारा घालित सृष्टीचाकर;
पाळण्यांत या घेउनि झोले,
झोपेनें पेंगुळले डोळे;
उठ, पूस ते सत्वर बाळा!
नरयज्ञ पहा तुझ्याच खालीं!
तुला न का या भिडती ज्वाळा?

असेल का स्वर्गी बहु शीतल
म्हणुनि तुवां पेटविला भूतल?
परमेच्छेचा विकास यांतुन
असेल जर होणार पुढें नव,
यज्ञ असो हा तुला समर्पण.

## नैवेद्य

भंवतालीं कालीचें मंदिर;
यज्ञाचें अन् कुंड मधोमध;
सळसळती जळजळत्या ज्वाळा;
रसरसती अंगार भयानक;
एक कुणी नर ओतुन गेला
दूध तुझें आणीक तुझा मध;
दुसऱ्यानें तुज मांस दिलें नव,
आणिक त्याकरितां केला वध;
तिसऱ्यानें तर देह दिला बघ,
आणि ठोकिली उडी मधोमध;
आणिक चवथा येउन कोणी,
नैवेद्य तुझ्या पुढचा खाउनि,

मिठी मारितो तव चरणाला;
        आलिंगुनि तूं त्याला वदशी,
"यश पावला तुझाच मजला!"

तुझेंच घेउन तुजला देणें;
अहंकार हा कधीं न धरणें.
नैवेद्य गमे जगांतलें सुख;
        अव्हेरूं कसा प्रसाद तव मी?
उगाच का त्वां दिलेंस हें मुख!

## प्रेम

बाळ कोवळें मी असतांना
मातेचें स्तनपान करितसें;
तूंच शिकविलें त्या दुग्धांतुन
शुद्ध कसें तें प्रेम वसतसे;
तरुण जाहलों आणिक नंतर
घट्ट प्रियेला आलिंगितसें;
तूंच शिकविलें त्या प्रणयांतुन
प्रेम कसें आत्यंतिक विलसे;
ध्येयनिष्ठ मग होतां पुढतीं
प्रेम जडे आदर्शांवरतीं;
तूंच शिकविलें त्या त्यागांतुन
अमूर्त असते प्रीति कशी ती.
शिक्षण देउन असलें उत्कट,
प्रेम तुझ्यावर करविशि शेवट;
प्रेमज्योत जी तेवे हृदयीं,

तूंच उजळिली अपुल्या हातें
शुद्ध, अमूर्त नि आत्यंतिक ही!

प्रेमांतच ना मिळतें जीवन?
प्रेमांतच ना घडतें वर्धन?
व्यर्थ न जावो इतकी खटपट.
—घाल मधें तूं काय हवें तें—
विलय असो प्रेमांतच शेवट.

## दिव्यदर्शन

चैतन्याच्या रथास आजी
जुंपवुनी काळाचा वाजी
कुठें चालली नकळे स्वारी.
स्वर्गंगा जी म्हणती, ती तर
चाकाची एकच चाकोरी!

भव्य दिव्य हें सिंहासन तव;
भेटव रे भेटव मज माधव;
सिंहासन तें धन्य खरोखरि :
विश्व दिसे जें या नयनांना,
विश्व न तें; त्याची तर पायरि!

नाचव बोटें कोठें कशिंही;
नाद घुमतसे दिशांत दाही;
घे स्वकरांनीं तव अधरावरि;
अनुराग निघो सप्तसुरांतुन;
देह नव्हे हा, तुझीच बांसरि!

## अयशाचें यश

आजपावतों शोधक झाले,
सुयश न आलें त्यांच्या हातीं.
चिता पेटल्या त्या दीप्तींतुन,
इतर धांवले पुढतीं पुढतीं;
अयशाचा हा माझा वाटा,
निदान नेवो इतरां पुढतीं.

जादूचा पसरून पसारा,
सुखदुःखांच्या ताणुन तारा,
नाचविशी मज जादूगारा;
कशास चिंता मज अयशाची ?
तूझीच छीःथू ! तुझाच तोरा !

मुकुट तुझा तो पूर्णत्वाचा
कधीं न माझ्या चढो शिरावर;
लढो परी हा जीव तयास्तव;
असेंच चालो अखंड संगर;
आणिक शेवट वज्रानें तव,
तोड तोड मम मस्तक केशव;
पाडव परि तें तव चरणावर;
विजयाचा उन्माद मिळो तुज !
पराजयांतच धन्य असो नर.

## खूणगांठ

कुणा प्रभातीं इतर जनांसह
वनांत गेलों करण्या उद्यम;

आणिक धरुनी तरुवर हातीं
हालविले मींही इतरांसम;
कुणास लाभे पिकलेलें फळ,
कुणास लाभे सुमन मनोरम;
काय पडे पण माझ्यापुढतीं ?
फुलें न गळती; फळें न पडतीं;
हालवितां मी तरु हातानें
दंवबिंदु घळघळती खालीं;
सळसळती सुकलेलीं पानें !

उरे न तरिही मनास चिंता;
उरे न कांहीं निराश खंता;
खूण पटे इतकी पुरती ही :
अश्रू जो देतो मजला तो
हात तयांना पुसण्या देई.

## पूजन

कोरंटी घेउनियां पिवळी
तुझ्या पुजेला पाय निघाले;
मंदीर जसें आलें जवळी
सहज जाहले वरतीं डोळे;
पहांट अजुनी होती काळी,
तारांगण त्यावर तेजाळे;
वाटे तव चरणावर मानी
फुलें उधळलीं हीं देवांनीं;
रानफुलांना येथ न किंमत;

फुलें फेंकलीं; अश्रू आले;
अव्हेर ! जरी असेल हिम्मत !

## माझें ओझें

आडाणी मी शिकारी खरा,
सदैव फिरतों निर्जन कंदर;
रक्त ओकतो घोडा थकुनी,
आसुड मी करितों खालींवर;
शिकार हातांतिल सोडुनियां
सिंहाच्या निघतों शोधावर;
सिंह कोठचा मजला मिळणें ?
नेम न माझा असे बरोबर.
जगांत होतें हसें घरोघर;
वेडा किंवा पिसाट हा नर,
हसशिल का तूंहि नारायण ?
दिसतिल का नच तुज माझे व्रण ?

'मिळतें' त्यावर हसते जनता;
मी रडतों 'न मिळे' त्याकरितां;
दिसो तुला पण 'ताज' मनांतिल
आणिक ताशिन दगड जन्मभर,
'ताज' पुरा जरि मम नच होइल.

मिळेल का सोन्याची घागर
माती तूं दिधलीस मला तर ?
ओझें एकच मी तर जाणें;
माती तूं दिधलीस मला तर
त्या मातीची घागर करणें.

## चुंबन

जीवन मजला यज्ञचि वाटे;
दिव्य कराया आत्मा थाटे;
पेटव अग्नी; चेतव ज्योती;
        सुखदुःखाचा मळ जळल्यावर
उज्वल आत्मा; उज्ज्वल कांती.

संध्या येइल; सूर्य न खळतो.
संध्या होइल; अस्त न टळतो.
संध्या येइल; कुठें, कधीं तरि.
        डरो न माझें हृदय, म्हणो पण
सुंदर आणिक दिव्य प्रभा, हरि!

वृथाच वाटे मृत्यूचें भय;
सर्वोत्तम तो शेवटचा जय;
मरणाच्या अधरांनीं चुंबुन,
        तूंच तुझें हें बालक घेशी,
आणिक देशी त्या आलिंगन.

दिवा मालवा; तेज न पसरे.
दिवा मालवा; अंधार भरे.
जीवनज्योती जादूची परि
        विझेल ही; आणिक त्यानंतर
प्रकाश होइल मग माझ्या घरिं.

चैतन्याच्या तुझ्या नदीवर
जीवितवृक्ष असे कललेला.
फुलेंच त्याचीं आम्ही हे नर;

आत्मा त्यांतिल मध भरलेला;
हीच एकली आस धरो बुध;
फूल गळो नी मिळो तुला मध.

## गूढ खेळ

ज्ञानाच्या शिखरावर जावें,
विश्व एकदां पाहुन घ्यावें,
म्हणुनि चाललों, वरतीं वरतीं
विश्व कोठचें शिखर न जोंवर,
क्षितिज धावलें पुढतीं पुढतीं.

फुकट गणावी का आशा ती ?
कांहींच न का आलें हातीं ?
भ्रामक आशा मनांत होती
—विश्व दिसो वा न दिसो मजला—
म्हणुनी चढलों इतुका वरतीं!

हेंच तुझ्या हृदयांत असावें;
जरा मुलाशीं खेळुन घ्यावें;
एक दाखवुन दुसरें द्यावें;
या खेळांतिल गूढ न कळतें;
त्या बाळांनीं अश्रु पुसावे.

## मुक्ति

वीट मला स्वत्वाचा आला;
ज्ञानाचा मग भरिला प्याला;

क्षणभर लोपे सर्व अहंता.
        तयें न केलें मुक्त सदा पण;
पुन्हां जखडिलें जातां जातां.
सुदिन असो हा ! दिव्य असो दिन !
आज न उरलें कांहीं बंधन;
जीवन तुजला करुनी अर्पण;
        अनुरागाचा पिउनी प्याला,
मुक्त जाहलों मी माझ्यांतुन.

करवीर; तासगांव; मुंबई.

# जीवितकोडें

संध्या झाली आतां;
सागरभरती आली;
बिंब रवीचें त्यावर येउन नाचे.
बिंब नव्हे हें :
संध्यादेवी
दिवसाचा सोनेरी शालू सोडुन,
रजनीची काळी चंद्रकळा नेसत आहे, गमतें,
—बिंब नव्हे हें—
नाभीकमलच दिसतें !
(लाजलाजली गालीं खुलली लाली)
क्षितिजामधुनी
पक्ष्यांचे ठिपके ते येती जमिनीच्याच दिशेनें;
मंजुळ गाणें
गाती माड सभोतीं आणिक डोलविती मग माना;
थुयथुयती पायाशीं खालीं हलक्याफुलक्या लाटा;
एकच दिसते होडी;
कुठून येऊन कुठें चालली नकळे !
शांती भरली दिशादिशांतुन;
शांती न मला थोडी;
भुतेंच जैशीं येउनि छळती मजला जीवितकोडीं.

मध्यान्हीचा सुमार झाला;
भरतीला घेऊन उराशीं सागर घोरत आहे.
होडी एक किनारीं;
ओल्या वाळवंटावर आतां उरला फेंस रुपेरी;
चिमणी झोंपुन आहे,

नारळिच्या पात्यांना लोंबुन घरटें हालत राहे;
पेंगुळलेले तारे
चंद्राचा हा दिवा मालवुन
पांडुर मेघांच्या शय्येवर कधींच झोंपुन गेले;
निद्रेचें साम्राज्य चहुंकडे झालें;
पाप काय मी केलें ?
हें शरीर माझें झोंपेविण कां वेडें ?
भुतासारखें येऊन छळतें मजला जीवितकोडें.

करवीर
२१.१.४१

## पहांटे

पहांट झाली भंवतीं;
शुभ्र धुक्याची चादर घेउन वरतीं
रजनीच्या मांडीवर अजुनी अवनी झोंपुन आहे;
आणिक अधुनीमधुनी
मंद सुगंधी श्वसनें सोडित राहे;
झोंपुन अवनी पाहे
अनंत स्वप्नें पुढच्ीं, स्वप्रणयाचीं;
अथवा अपुल्या आवडत्या ताऱ्यांचीं;
नव्या युगाचीं, नव्या जगाचीं, विश्वांच्या नाशाचीं;
आणिक वाहत गालांवरुनी
नयनांतिल नाना सरितांतिल पाणी.
पहाट अजुनी भंवतीं;
पूर्वेच्या समईंत तेवते शुक्राची नवज्योती.

मजला वाटत हेवा,
जीव असे मम, देवा,
निराश झाला पुरता
झोंपेकरितां, स्वप्नांकरितां धडपड करितां करितां.

करवीर
२७.२.४१

# नाच

उशीर होता अजुनी
म्हणुनी
गांवांतिल देवीचा
सोडुन नाचतमाशा आलों उघड्या चौपाटीवर;
पसरे पुढतीं सागर.

नाच मला मग दिसती;
झगझगती कीं विद्युद्दीपक—ज्योती
आकाशाच्या रंगमहालामध्यें;
आणिक वेगें
अद्‌भुतसा वाऱ्याचा पंखा घरघर फिरण्या लागे;
छेडुन गोड सतारी
साथ लागले करण्या माड किनारीं;
जुळला ठेका साचा
खडक धडक् धुम् बोल घुमविती चढल्या पखवाजाचा;
आणिक पुढतीं पुढतीं
हासतखिदळत लाजतमुरडत लाटा नाचत येती.

भंवतीं डोंगर सगळे
नाच पहाया जमले; पाहून धाले.
दृश्य पाहुनी खासें
वाळूचा तर कणकण खदखद हासे
आणिक मी वाळूंतच विरलों भासें.

आणिक नंतर
भग्न समाधी करुनी

नाद पडे कानांवर तोडुन अंतर.
थाप डफावर पडली;
कोळिण तिकडे सजली.
गांवांतिल देवीचा
नाच सुरू झाला हें मजला कळतें;
मन ना तिकडे वळतें.
छे; पाउल माझें इथेंच खिळुनी बसतें

# मंदिर

मंदीर न गवसे, भटकत मी.
या ऐन दुपारीं दाट तमीं.

सकाळपासुन करुनि तयारी
नाव हांकतों आणि दुपारीं
पुन्हां पोंचतों याच किनारीं.
ना अंतर तिळही होत कमी;
मंदीर न गवसे, भटकत मी.

फुलें पुजेचीं जाती वाळत;
विझुन चालली ही पंचारत;
मंदीर न तव मजला गावत;
मग करित तयारी पुनरपि मी;
मंदीर न गवसे, भटकत मी

तासगांव
१९४२

# निळा पक्षी

कांहीं केल्या
कांहीं केल्या
निळा पक्षी
जात नाहीं.

प्रकाशाचे
पंख सान;
निळी चोंच
निळी मान
निळे डोळे
निळें गान;
निळी चाल
निळा ढंग;
त्यानें चढे
आकाशाला
निळा रंग.

असली ही
जात न्यारी
बसे माझ्या
निंबावरी;
पृथ्वीमध्यें
पाळें खोल;
तरीसुद्धां
जाई तोल;

...अनंताचा
खड्डा खोल.

तर्कांच्या या
गोफणीनें
फेकितसे
कांहीं जड;
आणि पानें
आघातानें
करतात
तडफड;
टिकाळीला
निळा पक्षी
जसा धड
तसा धड;
...उंच जागा
अवघड.

याचें गान
याचें गान
अमृताची
जणूं सुई;
पांघरूण
घेतो जाड,
तरी टोंचे;

झोप नाहीं.
जागविते
मेलेल्याला;
जागृतांना
करी घाई.
याचें गान
याचें गान
स्वरालाच
नुरे भान.

नाहीं तार,
नाहीं मंद्र;
...चोंचीमध्यें
धरी चंद्र.

कांहीं केल्या
कांहीं केल्या
निळा पक्षी
जात नाहीं.

कागल

२५.८.५०

# मी सांपडलों त्या जाळ्यांतुन

पुन्हां आठवित उगमाजवळिल
जुनींपुराणीं अवखळ गाणीं;
मुक्या मनानें होतें वाहत
संथ नदीचें शीतल पाणी;

मुक्या मनानें हात वल्ह्याचे
हलवित होती होडी त्यावर;
मध्येंच खुळ्कन् वाजत होते
जलवलयांचे कंकण सुस्वर;

छायांची फेकुनियां जाळीं
जलांत खालीं, दोन तिरांवर,
विश्वाचें हें उकलित कोडें
मुकेपणानें बसले उंबर.

असा कसा पण, असा कसा पण,
मी सांपडलों त्या जाळ्यांतुन;
—आणिक हसला दुरून कोणी
गुरफटलेलें सावज पाहुन !

कागल
१२.१०.५०

# पिशी मावशी

मसणवटीच्या वाटेवरतीं
वाट थबकते एक ठिकाणीं !
आणि पाहतां भंवतीं दिसती
...फक्त चौथरे...नष्ट घराणीं.

उमगतील मग पडक्या भिंती,
जिवंत पारंबीचा धारण;
फक्त सात बेलाचे वासे;
—मला न ठाउक त्याचें कारण.

पिशी मावशी तेथें वसते;
गांव राहतो धरून डोंगर !
...एकलकोंडी...कुशींत घेते
लुकलुकणारें काळें मांजर.

सात दिसांनीं फक्त एकदां
सर्वांगाला लावुन रक्षा,
पिशी मावशी कोरण मागे;
चवताळे जर म्हणाल 'भिक्षा'.

"पिशी मावशी...पिशी मावशी"
म्हणतीं पोरें; म्हणतों मीही;
ती दिसतां पण खचते हिंमत
—अन् आठवतें दुसरें कांहीं !

कागल
३०.९.५१

# मला न कोठें मिळते जागा

फक्त एकटें फिरावयाला
मला न कोठें मिळते जागा.

...पारावरतीं विद्वज्जड वड
पुराण सांगे दृष्टांतासह
दाढीमधुनी फिरवित बोटें.
...एक मुळाचा पिंपळ करतो
कठोर, तात्त्विक तत्त्वचिकित्सा:
सोहम् । तत्सत् । सोहम् । तत्सत्.

...आम्रतरू पण संसारी नर!
ऐकुन घेई विसरुन जाण्या!
मुखांत त्याच्या हसरा मोहर.

...आत्मनिष्ठ अन् ठेंगू उंबर
उभा राहतो अवघड जागीं
आणि पाहतो अपुली छाया.
...भक्तीनें ओथंबुन बकुळी
मुकीच झाली; मुकेपणानें
लक्ष घालते रोज फुलांचा!

...फक्त एकटें फिरावयाला
मला न कोठें मिळते जागा.

बेळगांव
१.१२.५२

## मराठीचा विलाप

कां जाशी, माधव, सोडुन फुटला पान्हा ?
कां काळा नेशी आईपासुन तान्हा ?
ही प्रेमसरांतुनि वाहे मधुरा धारा
ती अधिऱ्या बाळावांचुन कोण पिणारा ?
तव आतुर ओंठावरुनी बिंदू गळती;
ते पिउनी मिळते रसिकजनांना शांती.

या मांडीवरतीं डोलवीत तुज बाळ,
मी वदिलें तुजशीं बोल किती स्नेहाळ;
अन् दोघांशींही मिळवुन अपुला सूर
जीं अनंत गीतें गुंफी हृदयसतार;
पडसाद तयांचे तव हृदयांतुनि उठले,
ते पिउनी सारे रसिक जगांतिल धाले.

तूं नाचत असतां धरुनी माझे हात,
तव मंजुळ सुस्वर पैंजणरव जो होत;
तो जीवितछंदासंगें मिश्रित झाला,
अन् माधुर्य नवें जगतीं ये जन्माला;
मग त्यांतिल कांहीं घुमला अंधुक नाद
तो रसिकां देई मोदाचा उन्माद.

रे बाळा ! तुजला घेउनि हृदयाजवळीं,
मी इच्छा, आशा, स्वप्नें कथिलीं सगळीं;
मग तूंही अपुले उघडुन हंसरे ओंठ
मज म्हणुनि दाविले त्यांतील कांहीं पाठ;
त्या गूढगुंजानांतिल जें कांहीं कळलें,
तें जाणुन रसिक जगांतिल वेडे झाले

कां निष्ठुर काळा, नेशी ओढून बाळ ?
हे त्याचे सगळे बाळपणींचे खेळ;
या मांडीवरतीं खेळत असता पुढतीं
तर जीवन आणिक जग हीं दुसरीं होतीं.

मनमाड
२९.१.४०

# प्रतिभेस

जादूची अधरीं पुंगी
धरुनी प्रतिभे ! कां ग उगी ?

दिव्य मुग्ध सुंदर सूर
कधिं तव अधरीं फुलणार ?

अजुनि तुझी ही हृदयकळी
विकसित झाली ना सगळी.

मकरंदाहुनि रुचिर अती
निःश्वास तुझे ना सुटती.

फूल तुझें फुलतां सगळें,
फुलांतुनी फुलतील फुलें.

तुझें अधरकंपन बाले,
होतिल हृदया हिंदोळे;

मृदुल गुलाबी तव गाल,
घालिल विश्वाला भूल;

तुझा लाडके ! आनंद
मम जीवित ब्रह्मानंद;

घेतां तव चुंबन बाले !
अनन्यतेचें तेज गळे;

रंगुन जाइन त्या रंगीं,
छेडिन वेडी सारंगी;

अश्रूंचा वाहुनी पूर,
धुविन तांबलेली तार.

जादूचा फुंकुनि फुंक
शमविन जगताची भूक;

ये वाजव प्रतिभे ! पुंगी,
आणव जगताला गुंगी.

करवीर
२.९.३६

# लाव्हा

ओततों हृदयिं जें लपुनि वसे;
जन वदतिल याला खचित पिसें.
    जड जगताच्या जुलमाखालीं
    मानवता जरि दडपुनि गेली,
    ज्वालामुखि ही जागृत झाली;
हा लाव्हा त्यांतुनि उसळतसे.
जन वदतिल याला खचित पिसें.

तासगांव
१७.९.४७

## निंद्कास

चढव शिरावर भार
भयंकर
चढव शिरावर भार.
नसेच माझी तिळही कुरकुर;
भार घेउनी तसा शिरावर
आनंदानें गांठिन मी घर;
मान न ही नमणार,
जाणशिल,
मान न ही नमणार.

घाल भराभर घाव,
घणाचे
घाल भराभर घाव.
वरवर क्षणभर शिळा हाद्रे;
झिजुनी जातिल थर जे झिजरे;
वृथाच गमतिल श्रम मग सारे;
आंत हिऱ्याचा ठाव
लागतां,
आंत हिऱ्याचा ठाव.

लाव हवी तर आग,
सभोंतीं,
लाव हवी तर आग.
सभोंवतींचा तव वडवानळ
खाऊनि टाकिल सर्व अमंगळ,
सुवर्ण नंतर उरतां निव्वळ

येईल रे तुज जाग,
तेधवां
येइल रे तुज जाग.

आण हवा तर पूर,
कलंकी,
आण हवा तर पूर.
अनंत कोरिन कोरिवलेणीं,
वाहुनि जाइल वरुनी पाणी;
पाण्यांतुन त्या वरच्या घाणी;
पाहशील गोपूर,
कलेचें
पाहशील गोपूर.

सोड विषारी बाण
जिव्हारीं
सोड विषारी बाण.
हृदय तयानें जातां फाटुनि;
खळखळ येतां रक्तचि हांसुनि;
धाईं धाईं रडशिल जाणुनि
त्वांच घेतला प्राण
आपुला
त्वांच घेतला प्राण.

करवीर
२१.१२.४०

## माझी बाग

फुलला बागबगीचा
        माझा
फुलला बागबगीचा.

बागबगीचा अपुरा पडतो;
तशांत मी फुलझाडें भरतों;
लोभ मनाचा वाढत जातो;
मार्ग इथें न सुखाचा
        मिळतो
मार्ग इथें न सुखाचा.

गुलाब अथवा असो कणेरी,
मुळांत जातों ओतित वारी;
हंसोत मजला जीं हंसणारीं !
न्याय इथें न जगाचा
        पुरतो
न्याय इथें न जगाचा.

फुलें इथें जीं, रसिका, फुलती
तीं नच तुजला दिसती, मिळती;
पडछाया ज्या हृदयीं पडती,
भास तुला तर त्यांचा.
        मिळतो
भास तुला तर त्यांचा.

कुणिही यावें; इथें बसावें;
जरा रमावें, गावें, जावें;

एकच हृदयीं स्मरण असावें;
स्पर्श इथें प्रेमाचा
खपतो
स्पर्श इथें प्रेमाचा.

करवीर
२२.३.४१

# रुद्रवीणा

उग्र म्हाताऱ्या वडांची लोंबते दाढी सभोतीं;
वेलकांडें वक्र अंगें नृत्यमुद्रा दावितातीं;
भंगलेल्या मंदिरीं या नग्न मूर्तींच्या पुढारीं,
मुक्तछंदें गीत गाते रुद्रवीणा अंधकारीं.

भेटते केव्हां मृगाच्या वादळाची क्रूर स्वारी;
चुंबिते केव्हां पहाटे मंद वाऱ्याची भरारी;
एकली, वेळींअवेळीं स्वेदिता आलिंगनानें,
रुद्रवीणा कंपते अन् गातसे रानांत गाणें.

मुंबई
२७.४.४५

## मृद्‌गंध

शीलाच्या पेढीवर मजला
   चेक नसे मम वटवायाचा;
त्यागांतील विकृत भोगास्तव
   मी नच विकली माझी वाचा.

मृद्‌गंधाच्या नजराण्याविण
   काय तुला मी दुसरें देणें;
मातींतुन मी आलों वरतीं
   मातीचें घेउनियां गाणें.

रत्नगिरी
२४.११.४९

## मांत्रिक

आम्हांला वाजवूं दे
आमची मुरली.
जरी पिचली
तिची पहिली
सुरेल सुरावट
विज्ञानयुगांतील
विविध जाणिवांच्या
विशाल उन्मेषांत;
आणि झाली
सात स्वरांचीं
सात सप्तकें.

हीच करील
विश्वकेतकीच्या
कांटेरी वनांतील
टपून बसलेल्या
कालसर्पाला
मंत्रमुग्ध;
हिचीच सोबत
अनंताच्या
निरुंद वाटेंत
मानवी मनाला
या अंधारांतही
देईल धीर.

कारण, पहा,
अनंताच्या
निरुंद वाटेंत
गतकालाच्या
स्थितिमान
वेटोळ्यावर
भविष्याची
उग्र फणा
डुलवीत डुलवीत
आहे उभा
कालसर्प;
ज्याच्या फणेवरील
दहाच्या अंकांत
दशावतारांच्या
घोर विजेत्याचें
उद्दाम मानचिन्ह !

कागल

: १ :

हा वेडा मानव जीवनबिंदू धरूनी
बघ जीवनसागर त्यासच समजे स्वमनीं;
अन तहान लागे हृदयाला जी सारी
वाहतां जलांतुन पाण्याविण नर मारी.

: २ :

तें प्रेम, ध्येय, वा अन्य पेय आत्म्याचें
या नयनापुढतीं अविरत निश्चल नाचे;
हा जीव बिचारा घोंटाळत त्याभंवतीं;
परि जीवन त्याला बोले, "पुढतीं...पुढतीं."

: ३ :

या इच्छाचौकीवरूनी पुढची वाट;
परि तिथेंच पसरी दैव आपुली खाट;
लुकलुके बाजुला आशादिप एकांतीं
तो अव्हेरुनि नर झोंपे खाटेवरतीं.

: ४ :

बघ धडधड आली कालरथाची स्वारी;
हे दूत धांवती देत खडी ललकारी;

घे कुदळ आपुली; लाग मार्ग बांधाया.
जे इथेंच बसतील, चिरडुन जातिल वांया.

: ५ :

हें जीवनअंबर दैवानें विणतांना
मांडिले उभे जरि निराशधागे नाना;
आडवें तयांतच आशासुत गुंफियलें;
छे, तुटो न कोणी, जीवन त्यांतुन सजलें

: ६ :

हा 'टकटक' ऐका काळपदाचा नाद;
हा काळ लागला मागें, तुज ना दाद;
हें भिंतीवरचें घड्याळ सुचवी तुजला
चल उचल पाउलें जों नच तुजशीं भिडला.

: ७ :

या काळवहींतिल दिनरजनीचीं पानें
परतून तयावर निसर्ग लिहितो कवनें.
ये वाच, वाच हें, जों ना उलटें दुसरें,
जें आज उलटलें तें न कधीं मिळणारें.

करवीर, सांगली, मनमाड.

# काजवे

## : १ : तहानंतर

माझ्या आणिक या जगताच्या
सह्या जाहल्या आज तहावर.
म्यान जाहलीं खड्गें अमुचीं;
संध्या झाली, सरलें संगर.
झोंप न मजला; त्याच तहाशीं
अखंड झगडे माझें अंतर !

करवीर

## : २ : भूत

सांगतसे मजला मम बुद्धी,
देव न वसतो मूर्तींत कधीं;
घणास मी घालतां परी कर
भूत कोठचें शिरतें हातीं ?
हात असा कां कापे थरथर ?

करवीर

## : ३ : गाढवाचें गाणें

मालक माझा आज असो नर
आज चढो पाठीवर फत्तर;

दिवस असे पण पुढतीं माझा,
गाढव होइल जेव्हां राजा.
आज जगीं जे मालक, ते नर
विनंति करतिल, "हे परमेश्वर,
हळहळ वाटे थोर अम्हां, पण,
लंबकर्ण दे, दे गाढवपण."

करवीर

## : ४ : घुमटीमागें

काळोख दाटला शिवालयाच्या भवतीं
थरथरे सभोतीं थंडी, वारा, भीती.
झोपले प्रवासी; कुणी न उरले जागे;
पाउलें वाजती हळूच घुमटीमागें !

## : ५ : पहिला शिक्षक !

कोण जगाचा पहिला शिक्षक
शिकवि नरा जो आत्मनिरीक्षण ?
बुद्ध न, येशु न, व्यासमुनी नच;
ओबडधोबड पहिला दर्पण !

रत्नागिरी

## : ६ : वकील

अंतिम विजयाविषयीं झाला
अहंकार सत्याला भारी;
आणि निर्मिला परमेशानें
वकिल जगीं जो ' अशिला ' तारी !

रत्नागिरी
१३.१.४२

## : ७ : मास्तर

गर्दी झाली म्हणुनि विनविलें,
" मास्तर, थोडं सरका ना वर. "
संतापुन तो मजला वदला,
" मी आचारी, मी नच मास्तर ! "

रत्नागिरी

## : ८ : माणुसकीचा महान शत्रू

माणुसकीचा महान शत्रू—
क्रूर हूण, वा मोंगल वा शक ?
छे ! छे ! हा नच ! ऐका सज्जन :
पहिल्या कुलुपाचा संशोधक !

## : ९ : नवा नकाशा !

नवा नकाशा दावी अंतर
‘ पाक ’ आणखी ‘ भारत ’ यांतील;
शांत मना हो ! गंगा-सिंधू
तशाच वाहत पुढतीं जातिल !

रत्नागिरी
२६.९.४८

## : १० : मंगळावर स्वारी !

कुठें वाचलें, “ शास्त्रज्ञांची
मंगळलोकावरतीं स्वारी ! ”
एक मला भय : मंगळ जनता
येईल आधीं त्यां सामोरी !

रत्नागिरी
२६.९.४८

## : ११ : पाळण्यांतील शिक्षण

सुमा जयाला निजवित होती;
करित पाळणा होता कुरकुर.
आणिक सुटलें मजला कोडें;
‘ कुरकुर ’ करतो त्याचमुळें नर !

रत्नागिरी
२६.९.४८

## : १२ : इतिहासाचें अवजड ओझें !

इतिहासाचें अवजड ओझें
डोक्यावर घेऊन ना नाचा;
करा पदस्थल त्याचें; आणिक
चढुनी त्यावर भविष्य वाचा !

रत्नागिरी
२६.९.४८

## : १३ : गजमुख !

विचार होतों करित मनाशीं
गजाननाला कशास गजमुख ?
मूर्ख खरा मी ! कसें कळावें
शिक्षित पत्नीचें इतरां सुख !

रत्नागिरी
२६.९.४८

## : १४ : उलटटपालीं

चोरुन लिहिलें पत्र पुण्याला;
'पाठव संततिरोधक साधन.'
आणिक आलें उलटटपालीं
पुस्तक—'ब्रह्मचर्य हें जीवन !'

रत्नागिरी
२७.९.४८

## : १५ : हेमगर्भ

धन्य सुवर्णा, तुझी खरोखर;
तुझ्या घरीं नर पोपट साचा.
उगाच का सोन्याची मात्रा
मरतां मरतां फोडित वाचा !

रत्नागिरी
६.१०.४८

## : १६ : सत्ययुगानंतर

सत्ययुगाच्या अखेर झाली
'प्रेम', 'द्वेष' यांच्यांत लढाई :
द्वेष जाहला विजयी आणिक
प्रेम लपे माईच्या हृदयीं !

रत्नागिरी
७.१०.४८

## : १७ : संतापा !

संतापा ! तूं नव असुरेश्वर;
जगांत भस्मासुर नच दुसरा;
इतरां भक्षिसि यांत नवल नच;
प्रथम भक्षिसी अपुल्या पितरां !

रत्नागिरी
९.१.४९

## : १८ : रिकामी वाटी

स्वर्गांतुन येतांना बालक
अमृत त्याचें काढुन घेती;
उरे रिकामी वाटी जवळी;
तीच खळी ही गालावरतीं !

रत्नागिरी
१२.१.४९

## : १९ : स्वर्गसुखास्तव !

हिरण्यकशिपू स्वर्गसुखास्तव
स्वर्लोकावर करिती स्वारी;
आणिक त्यांना हंसती माता
आंदोळ्याची ओढुनि दोरी !

रत्नागिरी
१३.१.४९

## : २० : सारांश !

रामायण वाचुनियां नंतर
बोध कोणता घ्यावा आपण ?
श्रीरामासम मिळता नायक
वानरसुद्धां मारिति रावण.

रत्नागिरी
१४.१.४९

## :२१: असेंच जग हें!

सत्कार्योस्तव अधम नरांचा
अनुनय करिती जगतीं सज्जन;
असेंच जग हें! शिवालयांतहि
नंदिस्पर्शाविण ना दर्शन!

रत्नागिरी
१४.१.४९

## :२२: क्षण

क्षणांत आहे अद्‌भुत शक्ति
आकुंचित-प्रसृत होण्याची;
'आदी'ला हाणुनियां लाथा
'अंता'ला ठोसा देण्याची.

रत्नागिरी
२०.१०.४९

## :२३: खादाड मावशी

अन्न मानवी सुखदुःखाचें
रोज खातसे; परंतु बेटी
अतृप्त सदा; तोंड न मिटते.
कोण वदा?—पोस्टाची पेटी!

## : २४ : चंद्र आणि क्षय

चंद्र जाहला क्षयी कशानें ?
शापबलानें म्हणती कोणी;
कुजबुजला पण तो माझ्याशीं;
"या कवितांनीं ! या कवितांनीं !"

## : २५ : नारदाचा वारस

नारद मेला; मी रडलों मग;
"कोण कळी त्या लाविल नाहक !"
"शोक कशाला ?" वदला ईश्वर,
"धाडुन दिधला मीं संपादक !"

## : २६ : पदवी

जिवंत असतां, महाकवे, तुज
मिळतिल निव्वळ शिव्या घरोघर;
तूं मेल्यावर, त्या मोजुनियां
मिळविल कोणी पदवी त्यावर !

रत्नागिरी
२२.१०.४९

## : २७ : भीति

जीवितवृक्ष नसे वठलेला
अश्रूंचें जोवर ओलेंपण.
तीच निराशा—तिला भितों मी—
जिथें कोरडें हास्य करी मन.

रत्नागिरी

## : २८ : उत्क्रांति

माकड हसलें, त्याच क्षणाला
माकड मेलें; माणुस झाला.
परदुःखानें रडला प्राणी;
देव प्रगटला त्याच ठिकाणीं.

रत्नागिरी
२०.३.५०

## : २९ : शाप

सर्व जगाला जिंकुन नंतर
मदन लागला जिंकाया शिव;
शाप शिवानें दिधला त्याला
" विजयामध्यें तुझा पराभव ".

रत्नागिरी
२.४.५०

## : ३० : सवतीमत्सर

विद्येशीं मी करितां हितगुज
मध्येंच करिशी आदळआपट.
प्रतिभे, तूं स्त्री; कशी खपावी
या सवतीची तुजला कटकट !

रत्नागिरी
३.४.५०

## : ३१ : दर्पण

परमेशाला गमलें, आपण
रूप पहावें अपुलें सुंदर;
आणिक केला त्यानें दर्पण;
तोच समजतों आपण सागर.

कागल
३१.७.५०

## : ३२ : काय नवल गा

बुडत्या संसारांत तुझें मी
नांव घेतसें, भ्यालेला नर;
काय नवल गा ! बुडतां बुडतां
घागरसुद्धां म्हणते, "ॐ हर"

## : ३३ : चंद्रोदय

अंधाराचा पदर पसरूनी
रात्र मागते भीक कशाची ?
भीक घालतो कोण कळेना;
ओंजळ चमके दोन पशांची !

मणचें

## : ३४ : 'जर–तर' भाषा

सगळ्याचा शेवट झाल्यावर
मुकी न बसते ही अभिलाषा;
हृदय चालतें रेतीं; आणिक
मनास छळते 'जर–तर' भाषा.

बेळगांव
९.१०.५२

भरतीची लाट

डुल्तां आंग्रुक् विर्येवानी;
तड्यो वारो शिर्तां कार्नीं;
गर्जत् समुद्रो दर्यो मानी;
घाल् पतिंगो, आव्जार् भंगो,
दिस्तां खाडीचो खय् कांट्?
संबाळ पाग्या, संबाळ पाग्या,
उट्ली भर्तीची लय् लाट्.

मुंबय्चि बोट बंबावाली
फोडित् समिंदर् म्होरे ग्याली;
वंगाळ् किरिस्ताव् गोव्यावालीं
त्येतुर् वक्ती, घाणिन् माक्ती;
कशाक गोन्याचो हय् थाट्!
संबाळ पाग्या, संबाळ पाग्या,
उट्ली भर्तीची लय् लाट्.

गद्गद्तां थय् यिंजिन् सारां;
हय् पन् मंजुळ् तडियां वारां;
हिर्वी आग्रां आर्यां हारां;
माडाच्यो पाती, भिरभिरत्याती,
बोंड्यान् पेंदी भरल्यो दाट्!
संबाळ पाग्या, संबाळ पाग्या,
उट्ली भर्तीची लय् लाट्.

वलाट्चिं कल्मां खारिन् ग्याली;
खलाट्चिं भातां किडिन् न्याली;

उक्लुन् वेरुन् कुळंऱ्यां म्यालीं;
  होड्कुल् ढक्लुन्, लाटेक् उक्लुन्,
धावात् त्येचां आमूचां ताट्!
संबाळ पाग्या, संबाळ पाग्या,
उट्ली भर्तीची लय् लाट्.

दाल्द्याचिं होड्कीं मोड्कींतोड्कीं;
कात्ळीवरसुन् धांव्लीं ब्याड्की;
फुट्ली लाट् नी भर्ली धड्की;
  कोळ्याचा पाग्लां, कदी नाय् भिव्लां,
वर्पित् जांव्चां दार्याची पाट्.
संबाळ पाग्या, संबाळ पाग्या,
उट्ली भर्तीची लय् लाट्.

म्हाव्रां बोल्तां, 'इलोर कोळी';
बांग्डो म्हन्तां, 'घेनार् बळी';
सळ्सळ् पळ्तां पान्यातळीं.
  घेऊन् भिर्कांव्, जाळां फिरकांव्,
बघ्तां कोळिन् घरसुन् वाट्!
संबाळ पाग्या, संबाळ पाग्या,
उट्ली भर्तीची लय् लाट्.

# चिकलीनंतर

" दणदणता सर्, फिर्ता नांगर्;
चिकल् झाली हा पुरी;
लाव् गो लाव्णी पोरी ! "

" मी नाय् येव्चंय, लावणी लाव्चंय्;
चिक्लांत् काटे भारी. "

" चिक्ल त लोण्यासारी ! "

" माका नाय् व्हव्चां, चिक्लात् जाव्चां;
माजी चोळि भर्जरी. "

" चिक्ल माजि सोनेरी ! "

" मी पोर् कव्ळी; वारो हा जौळी;
थर्थरी माज्या उरीं. "

" इर्लि घराच्या सारी ! "

" आये माजि पाट्लिण्, बाप् माजो पाटिल्;
पाट्लाचि पोर् मी न्यारी ! "

" घव मी तुजो शेत्करी ! "

करवीर

चेड्वां, ये गो माज्या घरीं.

जांब्करंदांनीं आड् भर्ली नी
आंबो पानापरी.

फुलां वव्ळिचीं माज्या पर्साचीं
जमिन् दडव्तत् पुरी.

धाविस् बरके धाविस् कापे
फणस् घराशेजारीं.

कल्माचो म्होवर् माज्या खळ्यावर ;
झुल्ती अब्दागिरी.

अमृताावानी पाटाचां पानी
व्हाव्तां बार्माय् दारीं.

माजा गो आगर माडाचा हां घर;
फोपळ् शंबर् तरी.

मळो मुरड्तां; आंबेम्होर् डुल्तां;
घम्घम्ता मग् दरी.

दर्यो गरज्तां; ऐकुक् येतां;
गातां तालावरी.

करवीर
...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ...६४७०८... दि: ...७।१८८...
वर्ग ...१८६०८... नोंदी दि ...८८३१८०७

# भुताबाईच्या राईंत

" भुताबाइच्या राइत् माजा घर आनी जिन्गनी;
पाव्ण्या, ये माज्या मागुनी!"

" दुपार्पासुन् चालुन् थक्लंय्;
पाण्यासाटी सोदुन हर्लंय्;
दम्लंय् गो लय्, अर्दो मेलंय्;
दिवस बुडालो, अंदार पड्लो, वाट् नाय् सर्ली तरी."
" पाव्ण्या ये रे माज्या घरीं!"

" अव्तांभव्तां जंगल् दिस्तां;
चाल्लय् ती वाट् कोण् गो पुस्तां?
पायापुड्ची बग् पण् दिस्तां;
मी खळतंय्, पण पाय चळ्तत् नी जात्त आपल्यापणीं."
" पाव्ण्या, ये माज्या मागुनी!"

" घुबड् कसा बग् खद्खद् हस्तां?
काव्ळो पिव्ळो घुड्घुड् कर्तां!
काव् काव् कर्तां कोकिल् सव्तां!
दोन पायांवर् चालत् झर्झर् ससो हिंडता दरी!"
" पाव्ण्या, ये रे माज्या घरीं".

" चंदर् उगव्तां, आबाळ् चडतां;
भुताबाइची राइ उमगतां;
येक् चव्तारो त्येतुर् दिस्तां;
पिपळावर्तीं त्येव्ता पण्ती; मी नाय् येव्चय् म्होरे!
" पाव्ण्या, जातस् खय्चो अरे?"

करवीर

# मोती

खंय् गो दिस्तां मोती माझो ?
सांग् पोरी, सांग् पोरी, सांग्.

भर्ली डौली कालाणाची;
न्हेरी त्येची येका येळ्ची;
वाड्ग्याखालीं न्हव्ली खाव्ची;
ताजो मुळो झालो शीळो; ह्येचो खंय् हा थांग् ?

नया वुंड्लिचां, बिन्घम्ताचा,
आंग्रुक त्येचां नया शिडाचां,
मकान कापुन् येद्वां यंव्चां;
दिवस् बुडालो लाटेखालीं; ह्येचो खंय् हा थांग् ?

साव्ळ्यो पड्ल्यो नार्लीखालीं;
वाळ्वट् झाली समृदी ओली;
पालावर्ची फोपळ् लव्ली;
वारो जौळी, दर्यो ढव्ळी; ह्येचो खंय् हा थांग् ?

भिंग्रीसारो सुट्लो वारो;
दर्यो झालो गोरो-मोरो;
लाटेम्होरे खंय्चो थारो,
मंगो इलो, गंगो इलो; ह्येचो खंय हा थांग ?

मुंबई
२५.७ ४०

## मुंबय्‌ची चाकरी

"जाउ नको र झिला मुंबय्‌का
सोडुन्‌ माका घरीं;
मी म्हातारी, येकुलतो तूं;
भंगो ती चाकरी!"

"ह्यां काय बोल्‌तस्‌ आय्ये येडां,
बेगुन्‌ व्होशी बरी;
सरायिचीं भातां कापूकां
येव्‌चंय्‌ मी माघारी.

कर्जाखाली शेतां गेलीं,
साव्‌कार्‌ धरणां धरी;
घरण्‌ उपाशी तूं बी तैशी;
छे कर्‌तंय्‌ चाकरी.

गिर्‌णीचां काम्‌ मिळात माकां
निदान्‌ रातीं तरी;
भिती वाटता तुका कशाची?
नाय्‌ पडोचय्‌ आजारी.

इश्वास तुजो का नाय्‌ इतको?
शपत्‌ गळ्याची तरी:
मी नाय्‌ पिवचंय्‌, मी नाय्‌ शिव्‌चंय्‌,
दारु इकाच्या सारी."

इली सरायी, लेक परततां
होवोन् दुकूणेकरी;
"आय्ये!" म्हण्तां दार् उगडता
घरण् येकली घरीं!

तासगांव.

चखोट झालें पाउसपाणी;
सरलीं कामें; स्फुरलीं गाणीं.
भातावरतीं उठवित लाटा
लोळत जाई वारा मोठा;
कोंकणचा कंगाल कवी मग
गेला शोधित देवळ लगबग.
भावय होती ! चैतन्याचें
उठलें वादळ; वदवी वाचे:
—साधीभोळी ढोलाची लय—
'नाचा भावय ! नाचा भावय !'

पोंभुर्ल्यांतिल हा स्थानेश्वर,
सांब सदाशिव भोळा शंकर;
रुचेल त्याला अमुची भावय,
जी नच मानी जाती चें भय;
असली भावय नाचत असतां
एकच स्मरणें: आपण जनता,
जनता, जनता, जनता आपण;
अद्वैतांतच या नारायण.
तुडवूं मीपण; बनूं प्रेममय.
'नाचा भावय ! नाचा भावय !'

चला वाढली ढोलाची लय,
लाल चिखल हा; लालच भावय.
भावय घुमली; झाली दाटी;
चला चला रे धरा चिकाटी;

भिडवा खांदे; मारा पक्कड;
अभेद्य घडवा छातीचा गड;
लढा, चढा, वा पडा बरोबर;
सर्वच मालक; कुणी न चाकर;
समान व्हा अन् व्हा मृत्युंजय,
' नाचा भावय ! नाचा भावय ! '

या चिखलाची लावुनि टिकली
विसरुनि जाऊं चिन्हें नकली;
माणुसकीचें बांधूं मंदिर,
आकाशाचें ज्यावर छप्पर;
बंधुत्वाचें एकच नातें
मानुनि पुजुंया नवमानवते;
अभिषेक धरूं स्वातंत्र्याचा;
मंत्र न दुसरा : प्रेमळ वाचा.
मानवतेचा बोला रे जय;
' नाचा भावय ! नाचा भावय ! '

मातींतुन या आलों सारे;
मातींतच अंतीं जाणें रे.
आधीं माती, माती शेवट;
कशास मग स्वार्थाची कटकट ?
समतेच्या माहेरीं सारी
बंधुत्वाची गोड न्याहारी;
या मातीला ठेवुन साक्षी
चला बनूंया उडते पक्षी.
दुनिया अपुली; कशास संचय ?
' नाचा भावय ! नाचा भावय ! '

सभोवतीं आंब्याची झाडी
त्यांतच दडली अमुची वाडी;
छोटे गोटे; घरें चिमुकलीं;
शाकारावर तिळयें फुललीं;
खळयांत इवलें अळें उगवलें;
मळयांत खालीं भात पसवलें;
खट्याळ ओढा झुंजत येई,
धोधो, खळखळ, झुळझुळ वाही;
हें काय कमी; भूच स्वर्गमय !
'नाचा भावय ! नाचा भावय !'

रत्नागिरी
१२.१२.४८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ......७४१०८........ दि: ......
क्रमांक ......१०७०८...... नों: दि: ......

REFBK-0017547
REFBK-0017547

क्र. १०५४८